
# माणूस

शनिवार । २० मे १९७८ । ७५ पैसे

ज्या वेळी मुरब्बी राजकारणी आणि विद्वान पत्रपंडित
इंदिरा गांधी राजकीयदृष्ट्या संपलेल्या आहेत
असे ठामपणे समजून लिहीत-बोलत होते
त्या वेळी ' माणूस ' ने
' रायबरेली विशेषांक ' ( १० सप्टेंबर ७७ ) काढून
त्यांच्या राजकीय पुनरागमनाची सविस्तर चर्चा वाचकांसमोर ठेवली.



आता त्यांचे पुनरागमन ही वस्तुस्थिती झालेली आहे.
केवळ त्यांचेच नाही, त्यांच्यासोबत संजय आणि त्याच्या टोळीचेही.
कारण इंदिरा–संजय हे अलग न होऊ शकणारे मायलेकरू आहे.
हे मायलेकरू पुन्हा सत्तेवर येवो न येवो
हे गजाआड जावो न जावो
त्यांच्या गजाआडच्या किंवा गजाबाहेरच्या अस्तित्वालाच
राजकीय अर्थ प्राप्त झालेले आहेत.
या राजकीय अर्थांची–अनर्थांची चर्चा करणारा

## माणूस : आझमगढ विशेषांक

किंमत : सुमारे दीड रुपया । प्रसिद्धी : २७ मे । व्यंगचित्रे : शि. द. फडणीस

# साप्ताहिक माणूस

वर्ष सतरावे-अंक एक्कावन्न

२० मे १९७८

मूल्य पंचाहत्तर पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९


## संघ-टीकाकार आणि माझ्या अपेक्षा

गेली अनेक वर्षे आणि विशेषतः आणीबाणी उठल्यानंतर संघ ( आणि म्हणून जनसंघ ) हा काहीजणांच्या कौतुकाचा आणि काहीजणांच्या विखारी टीकेचा विषय झाला आहे सतत पन्नास वर्षे जी संघटना या ना त्या कारणाने राष्ट्रभर चर्चेचा विषय होते आहे, ह्याचाच अर्थ ती संघटना ह्या राष्ट्रातील एक महत्त्वपूर्ण संघटना आहे. अशा संघटनेबद्दल मला म्हणजे एका सामान्य नागरिकाला काय वाटते हे सांगण्यासाठी हा प्रपंच.

प्रथम मी हे स्पष्ट करू इच्छितो की मी संघस्वयंसेवक नाही वा नव्हतो. त्याचप्रमाणे मी संघाचा कट्टर विरोधकही नाही संघावर दोन वेळा बंदी घालण्यात आली तरी सुद्धा ही संघटना नेस्तनाबूत झाली नाही, होऊ शकणार नाही. एव्हढेच नव्हे तर ती प्रत्येक बंदीनंतर अधिक जोमाने उभी राहिली. ह्याचाच अर्थ असा आहे की, ह्या वृक्षाची पाळेमुळे फार खोलवर रुजली आहेत.

संघावर अनेक आक्षेप घेतले जातात, त्यांपैकी एक म्हणजे ही संघटना फॅसिस्ट लढाऊ आहे. जर ही संघटना लढाऊ असती तर तिच्यावर बंदी घालण्यापूर्वी शासनाने अनेकदा विचार केला असता. फॅसिस्ट असती तर ह्या संघटनेने बंदी आल्यानंतर भूमिगत होऊन शासनाशी वेगळ्या तऱ्हेने लढा दिला असता; पण तसे झाले नाही. फॅसिस्ट असती तर प. पू. गोळवलकरगुरुजींवर परदेशगमन-बंदी लादली त्या वेळेस आपल्या एकमेव नेत्यासाठी सारे राष्ट्रभर आंदोलन ( तेही सशस्त्र, कारण लढाऊ म्हणून ) केले असते; पण तसे झालेले नाही. ह्याचाच अर्थ असा की, काही चलनी शिव्या देण्यात वा झिजून गेलेले आरोप वा आक्षेप घेण्यात अर्थ नाही.

माझी हळहळ वेगळ्या कारणासाठी आहे. आजचा तरुण कोणाचेही ( अगदी आईबापांचेही ) ऐकत नाही. असा फार मोठा तरुणवर्ग महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाले तर दोनच संघटनांकडे आकर्षिला गेला आहे. एक म्हणजे शिवसेना आणि दुसरी रा. स्व. संघ ! कोणत्याही कारणांमुळे का असेना शिवसेनेकडे आलेला हा तरुणवर्ग नेत्यासाठी, त्याच्या शब्दाखातर वाट्टेल ते करावयास सिद्ध झाला आहे. पण ? आपल्याला ठाऊक आहे की, कोणाही नेत्याने हेवा करण्याजोगे पाठबळ लाभूनसुद्धा त्याचा योग्य तो उपयोग शिवसेनाप्रमुखांना करता आला नाही. माझा तोच आरोप वा आक्षेप रा. स्व. संघावरही आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य स्वयंसेवक हे मध्यमवर्गीय आहेत. ( ते साऱ्या जातींतील आहेत असे संघनेत्यांचे म्हणणे मान्य करू या. ) ह्यात वाद घालण्यासारखे काही नाही. पहिल्या बंदीपर्यंत संघस्वयंसेवकांना ह्या संघटनेत भाग घेतल्यामुळे कोणते परिणाम भोगावे लागतील ह्याची कल्पना नव्हती असे मानू या; पण त्यानंतरही ह्या सावध मध्यमवर्गीयांकडूनच स्वयंसेवक निर्माण झाले. कोणतेही धाडस वा अवाजवी धैर्य न दाखविणे हा स्वभावधर्म असलेला हा मध्यमवर्गीय तरुण ह्या संघटनेत येतो कसा? त्यांचे आईवडील त्यांना परवानगी देतात कशी ? ह्यामुळेच ह्या संघटनेबद्दल माझ्या मनात वेगळ्या भावना आहेत. संघस्वयंसेवक होणे म्हणजे तशी फारशी सुखाची गोष्ट नाही. आणीबाणीकाळात तर शासनाची दृष्टी कशी होती ( स्वयंसेवकांच्या बाबतीत ) हे आपण पाहिले आहे, वाचले आहे. तरीसुद्धा आज मोठ्या अभिमानाने गणवेष घालून संघस्थानावर जाणारे स्वयंसेवक मोठ्या संख्येने दिसत आहेत. त्यांनी अगोदरच्या घटनांची धास्ती घेतली नाही हे स्पष्ट दिसते आहे. अर्थात् ह्यावर असे म्हटले जाईल की आज केन्द्रात आणि अन्य अनेक राज्यांत जनता पक्षाचे शासन आहे आणि ह्या पक्षाच्या यशात संघाचा वाटा सिंहाचा आहे; पण उद्याचे काय ?

ज्या तऱ्हेने घटना घडत आहेत आणि जनता-शासनाची पावले पडत आहेत (उदा. हिंसक कृत्ये, माताजींचा विजयी पवित्रा आणि दारुबंदीसारखी ढोंगे इ.) त्यावरून फार काळपर्यंत जनताशासन वा जनतापक्ष खऱ्या अर्थी जनतेचा पक्ष ( शासन ) राहील असे वाटत नाही. काही जणांना हा आज

निराशावाद वाटण्याची शक्यता आहे; पण प्रतिकूल केव्हा आणि कसे घडेल ह्याची *ग्वाही कोण देणार ? आणि* म्हणूनच संघाकडे जाणारे तरुण ह्या सर्वांचा विचार करतात किंवा नाही हे कळणे कठीण आहे. केवळ अविचाराने वा भावनेपोटी स्वयंसेवक होत असतील असे समजण्याचे कारण काही. सारांश काय संघ नव्या उमेदीने उभा आहे, अधिक बलवान आणि अधिक व्यापक होत आहे एवढे मात्र नक्की !

संघाला नव्या रक्ताची, त्यागाची, बुद्धिमत्तेची उणीव कधीच भासली नाही. संख्येची तर नाहीच नाही. माझ्यासमोर प्रश्न पडतो तो हा की, ही संघटना सिंहावलोकन करते का ? बदलत्या काळाचा, परिस्थितीचा, आव्हानाचा विचार करते का ? आपण काय केले, कशासाठी केले आणि किती केले, ह्याचा विचार करून पावले टाकली जातात का ? *माझ्या अपेक्षा खूप आहेत.* अपेक्षा करावयाच्या का हा खरा प्रश्न आहे. उदाहरणात बोलतो म्हणजे मुद्दा स्पष्ट होईल. नागपूर हे संघाचे केन्द्र; पण त्या नागपूरबद्दल काही दिवसांपूर्वी एका वरिष्ठ पोलिसअधिकाऱ्याने उद्गार काढले की 'त्या नागपुरात (मी अनेक ठिकाणी काम केले आहे.) सांस्कृतिक पोकळी जाणवत आहे.' ह्याची दखल गंभीरपणे जशी इतर संघटनांनी, शासनाने घ्यावयाची तशी संघाने घ्यावी की नाही ? अवश्य घेतली पाहिजे! दुसरे म्हणजे समाजात ज्या ज्या वेळी काही दुर्दैवी घटना घडतील तेव्हा अगर एखादी व्यक्ती गुंडांची, दहशतवाद्यांची लक्ष्य बनत असेल तेव्हा कोणी धावून जायचे ? मला असे वाटते की, हे काम जसे इतर संघटनांचे, व्यक्तींचे आहे तसेच ते संघ-स्वयंसेवकांचेही आहे. नव्हे त्यांनी प्रथम अशा वेळी धावत गेले पाहिजे. ते तसे धावून *जात नाहीत असे मला सुचवायचे नाही;* परंतु त्यांना मिळणारे शिक्षण आणि त्यांची संख्या विचारात घेता तसा ठसा त्यांनी महाराष्ट्रात तरी अजून उमटविला आहे असे वाटत नाही. संघाकडे असणाऱ्या अफाट मनुष्यबळाचा, अमाप शक्तीचा शोध त्यांना लागला नाही, की ही ताकद अशा कार्यासाठी वापरावयाची नाही असे त्यांनी ठरविले आहे ? तसे असेल तर त्याहून दुर्दैवाची गोष्ट दुसरी कोणतीच असू शकणार नाही !

संघात अहिंदूंना प्रवेश याबाबतीत विचारांती निर्णय ठरणार आहे; पण मला वाटते की अहिंदू म्हणजे प्रथम संख्याबळामुळे लक्षात येतात ते मुसलमान. अगदी उद्यापासून जरी संघाने मुसलमानांना प्रवेश देण्याचे ठरविले तरी किंवा मुस्लिम मोहल्यातून संघशाखा सुरू केल्या तरी काही उपयोग होणार नाही. कारण त्या समाजाची आजपर्यंतची जडणघडणच वेगळी आहे. अशा संघटनांतून समाजोपयोगी (आपल्या समाजाव्यतिरिक्त) कार्य करणे ह्याची फारशी शिकवण त्यांना मिळालीच नाही! राष्ट्रसेवादलात तर सर्व धर्मीयांना प्रवेश आहे ना ? मग किती अहिंदू दलसैनिक आहेत ? काँग्रेस सेवादलात तरी किती अहिंदू सैनिक आहेत? जाणत्यांनी आकडा सांगावा.

सारांश, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक ह्या राष्ट्राचा चेहरामोहरा बदलू शकतील, आमूलाग्र परिवर्तन करू शकतील इतकी ताकद त्यांच्याजवळ आहे यात शंकाच *नाही; पण हे आव्हान ते स्वीकारणार* काय ? की अजून आमची वेळ आली नाही असाच मंत्र जपत राहणार ? काळाच्या उदरात काय आहे कोणास ठाऊक !

**चंद्रशेखर रमाकांत राजे,** डोंबिवली

---

राजधानी दिल्ली

प्रतिनिधी

# केंद्रीय 'त्रिमूर्ती'ला दुसऱ्या फळीचे आवाहन

लोकसभेमधली एखादी जागा गमवावी लागली म्हणून अस्वस्थ व्हावे अशी जनता पक्षाची अवस्था नसली तरी आझमगडमधला पराभव हा त्या पक्षाच्या दृष्टीने निश्चितच चिंतेचा विषय ठरतो— निदान ठरला पाहिजे. कर्नालने एक हादरा अगोदरच दिला होता, त्यानंतर हा दुसरा ! कर्नालमध्ये कशीबशी जागा टिकविण्यात तरी जनता पक्षाला यश लाभले होते. आझमगडमध्ये तसेही घडले नाही. 'जनता'च्या रामबचन यादव यांना पस्तीस हजार मतांनी पराभूत व्हावे लागले—गेल्या वर्षीच्या मार्चमधल्या निवडणुकीत इतर अनेक राज्यांप्रमाणे उत्तरप्रदेशातही काँग्रेसला एकदेखील जागा मिळाली नव्हती. त्या वेळी आझमगड मतदारसंघात 'जनता'चे रामनरेश यादव यांनी चंद्रजित यादव यांचा एक लाखांहून अधिक मतांनी पराभव केला होता. या वेळीही चंद्रजित यादव उभे होते—पण ते उभे होते इतकेच. आपला हमखास पराभव होणार आहे हे त्यांनाही माहीत होते. मग ते निवडणूक लढविण्यासाठी का तयार झाले ? उत्तर अगदी साधे आहे. 'जनता'च्या रामबचन यादव यांची मते खाण्यासाठी ! स्वर्णसिंग काँग्रेस जनता पक्षाबाबत हातमिळवणीचे धोरण स्वीकारीत आहे हा इंदिरा गांधींचा आरोप खरा नव्हे एवढे दाखवून देण्यासाठीच चंद्रजित यादव निवडणुकीच्या रिंगणात उतरले. परंतु जनता पक्षाला अपशकून करणे तर त्यांना जमलेच नाही; उलट त्यांना पडलेल्या अठरा हजार मतांमुळे स्वर्णसिंग काँग्रेसची किती केविलवाणी अवस्था झाली आहे हेच दिसून आले ! कर्नालमध्ये शशिभूषण यांना अनामत रक्कम गमवावी लागली होती. चंद्रजित यादव तेवढी नामुष्की तरी टाळतील असे स्वर्णसिंग काँग्रेसला वाटत होते; परंतु चंद्रजित यादवही आपले डिपॉझिट वाचवू शकले नाहीत! इंदिरा काँग्रेसच्या मोहसिना किडवाई यांना रामबचन यादव यांच्यापेक्षा पस्तीस हजार मते अधिक मिळाली. याचा अर्थ असा की, चंद्रजित यादव उभे राहिले नसते तरीही रामबचन पराभूत झाले असते. त्यामुळे जनता पक्षाचा उमेदवार पडला म्हणून स्वर्णसिंग काँग्रेसला हर्षवायू झालेला दिसत असला तरी त्या कर्तृत्वात आपला किंचितही वाटा नाही, मतदारांच्या डोळ्यांपुढे फक्त 'जनता' आणि इंदिरा काँग्रेस हेच दोन पक्ष आहेत, ही वस्तुस्थिती त्या पक्षाची हास्यास्पद अवस्थाच सिद्ध करते.

## इंदिराजींची मल्लिनाथी

मोहसिना किडवाई निवडून आल्यामुळे 'लोक माझ्याच पाठीमागे आहेत' असा दावा करायला इंदिरा गांधी यांना संधी मिळाली आहे. ते सांगण्यासाठी त्या मुद्दाम संसदेच्या मध्यवर्ती सभागृहात येऊन गेल्या. पंतप्रधानपद गेल्यापासून या सभागृहात येण्याची त्यांची ही दुसरी वेळ होती. कांग्रेसच्या दुसऱ्या विभाजनाची पूर्वतयारी करीत असताना त्या अशाच अचानक येऊन गेल्या होत्या. त्या तेथे यायला नकोत असे वाटणाऱ्यांचीही त्या वेळी भलतीच धावपळ उडाली होती. एकट्या देवकांत बारुआंनी तेवढी इंदिराजींच्या आगमनाची दखल घेतली नाही. बाकी सगळेजण लगबगीने इंदिराजींच्या स्वागतासाठी मध्यवर्ती सभागृहात येऊन दाखल झाले होते. या सगळ्या मंडळीत पंचाईत झाली होती ती यशवंतराव चव्हाण यांची. या वेळी ते संसदेत हजर नसल्यामुळे, इंदिराजींच्या स्वागताला जायचे का नाही हा प्रश्न त्यांच्यापुढे पडला नाही. इंदिरा गांधींकडून सतत अवमान होत असताना आणि त्यामुळे मनात त्यांच्यासंबंधी संताप धुमसत असतानाही यशवंतराव चव्हाण जाहीरपणे आपण इंदिरानिष्ठ असल्याची ग्वाही देत असत. वेगळा पक्ष स्थापन करून इंदिराजींनी यशवंतरावांना आपल्यासंबंधींचा राग व्यक्त करण्याची संधी दिली. मात्र ती संधी देत असतानाच यशवंतरावांकडे गेले वर्षभर असलेले विरोधी पक्षनेतेपद त्यांनी हिरावून घेतले. यशवंतरावांच्या इंदिरा-विरोधाला अलीकडे जी धार चढली आहे त्यामागचे ते एक प्रमुख कारण आहे. तसे नसते तर तडजोड करण्यात जन्म घालविलेला माणूस एकदम बंडाची भाषा बोलण्यास प्रवृत्त झालाच नसता !

'आझमगडमधल्या निवडणुकीत जनता पक्षाने जातीयवादाचा आधार घेतला' असा इंदिरा गांधींनी मध्यवर्ती सभागृहात बोलताना जो आरोप केला तो सार्थ आहे. त्या मतदारसंघातील यादव समाजाची बहुसंख्या लक्षात घेऊनच जनता पक्षाने रामबचन यांना तिकिट दिले. त्यामुळे या निवडणुकीला यादव विरुद्ध यादवेतर असे स्वरूप आले. रामनरेश यादव मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांनी आपल्या समाजातील अनेक जणांची निरनिराळ्या जागांवर वर्णी लावली आहे. यादवांचे हे वाढते वर्चस्व इतर जातींना खटकू लागल्यामुळे या निवडणुकीच्या वेळी त्यांनी आपोआपच युती केली. या युतीचा फायदा घेण्यात इंदिरा गांधींनी चातुर्य दाखविले. ते त्यांचे नेहमीचेच तंत्र आहे. असुरक्षिततेच्या भयाने ग्रासलेल्या अल्पसंख्याक समाजांना हाताशी धरून निवडणूक लढवावयाची हा इंदिरा गांधींचा ठरीव डावपेच आहे. त्यामुळे इंदिराजी ज्या जातीयवादाचा जनता पक्षावर आरोप करतात त्या जातीयवादाचा अवलंब करताना त्या स्वतःही मुळीच संकोचत नाहीत. मुसलमान, हरिजन आणि ब्राह्मण या अल्पसंख्यांक समाजांचे आपण तारणहार आहोत असा त्यांनी आझमगडमधल्या प्रचारमोहिमेमध्ये पवित्रा घेतला आणि तो त्यांना यश मिळवून द्यायला उपकारकही ठरला. बहुसंख्यांक जमातीचे वर्चस्व खच्ची करण्यासाठी निरनिराळ्या अल्पसंख्याक जातींना एकत्र आणण्याची किमया केली की निवडणूक जिंकणेही सोपे जाते आणि आपली प्रतिमाही पुरोगामी होते हे इंदिरा गांधींना अनुभवाने ठाऊक झाले आहे. या संदर्भात महाराष्ट्रातील त्यांचा पवित्रा ध्यानात येण्यासारखा आहे. स्वर्णसिंग कांग्रेसवर मात करण्यासाठी इंदिरा गांधींनी ए. आर. अंतुले, नाशिकराव तिरपुडे आणि वसंत साठे यांच्या हातात आपल्या पक्षाच्या महाराष्ट्र शाखेची सूत्रे दिलेली आहेत आणि त्याचा त्यांना अपेक्षित असलेला परिणामही दिसू लागला आहे. यशवंतरावांनी जातीयवाद एका वेगळ्या तऱ्हेने राबविला. इंदिरा गांधी तो दुसऱ्या रीतीने हाताळीत आहेत. यशवंतरावांच्या वाढत्या बेचैनीचे तेही एक कारण आहे.

## रामनरेशांची हडेलहप्पी

आझमगडपुरता विचार करायचा तर यादव विरुद्ध यादवेतर हा वाद जेवढा जनता पक्षाच्या पराभवाला कारणीभूत झाला तेवढाच वाटा त्या पक्षामधील अंतर्गत कलहाचा आहे. निवडणूक तोंडावर आलेली असताना महामंत्री रामनरेश यादव यांनी सत्यप्रकाश मालवीय यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करून यादवविरोधी वातावरणात भर घातली. मतदान पार पडेपर्यंत आपण थांबावे असेही यादव यांना वाटले नाही, यावरून पक्षहितापेक्षा स्वतःच्या सत्तास्थानाचीच त्यांना किती काळजी लागलेली आहे हे दिसून आले. आणखी काही काळ रामनरेश यादव यांना किंवा त्यांच्यासंबंधी विशेष अगत्य बाळगणाऱ्या चरणसिंगांना हे असले हडेलहप्पीचे वर्तन निभावून नेता येईलही; परंतु पक्षाची लोकप्रियता घसरणीला लागल्यानंतर पक्षाबरोबर आपणही आपली विश्वसनीयता गमविणार आहेत ही साधी गोष्ट त्यांच्या अनुभवाला यायला फारसा वेळ लागणार नाही.

रामनरेश यादव आणि सत्यप्रकाश मालवीय यांच्यातील संघर्ष जनता पक्षाच्या संसदीय मंडळाने अटलबिहारी बाजपेयी आणि जॉर्ज फर्नांडिस यांच्याकडे निर्णयासाठी सोपविला आहे. या दोघा केंद्रीय मंत्र्यांशी बोलणी करण्याकरिता रामनरेश यादव, सत्यप्रकाश मालवीय आणि राज्य जनता पक्षाचे अध्यक्ष अब्बासअली दिल्लीला येऊन गेले. मालवीय यांना मंत्रिमंडळात पुन्हा घेतल्याशिवाय यादव यांच्या विरोधात असलेला बंडखोर गट स्वस्थ बसणार नाही उलट कोणत्याही परिस्थितीत मालवीय यांना मंत्रिपद देणार नाही असा यादव यांचा हट्ट आहे. या दोन्ही गटांना थोडीशी माघार घेण्याचा सल्ला बाजपेयी आणि फर्नांडिस यांनी दिला; परंतु तो स्वीकारण्याच्या मनःस्थितीत दोन्ही गट नाहीत. चरणसिंगांना भेटण्याची डॉक्टरांनी मनाई केल्यामुळे त्यांची भेट न घेताच यादव यांना लखनौला परतावे लागले. चरणसिंग कोणता सल्ला देतात यावरच रामनरेश यादव यांचे पुढील धोरण अवलंबून राहील. त्यामुळे चरणसिंग बरे होईपर्यंत उत्तरप्रदेशाच्या राजकारणामध्ये निर्माण झालेला पेचप्रसंग सुटण्याची शक्यता कमी आहे. हे सारे लक्षात घेऊनच बाजपेयी आणि फर्नांडिस यांनी यादव, मालवीय आणि अब्बासअली यांना आठवडाभराने पुन्हा दिल्लीला येण्याबाबत सुचविले आहे. हा मधला काळ रामनरेश यादव, देवीलाल यांच्याप्रमाणे, विधिमंडळ पक्षातील आपले स्थान घट्ट करून घेण्याच्या दृष्टीने वापरण्याची दाट शक्यता आहे. हरयाना विधानसभा जनता पक्षातील सात बंडखोर सदस्यांना आपल्याकडे वळवून घेण्यात देवीलाल यशस्वी झाले आणि त्यामुळे त्यांना आपल्या मंत्रिमंडळाची संपूर्ण फेररचना करता आली. उत्तरप्रदेश विधिमंडळ जनता पक्षातील आपले बहुमत कायम आहे अशी जर रामनरेश यादव यांची खात्री झाली तर तेही आपल्या सध्याच्या मंत्रिमंडळाचा

मलपृष्ठ १ वर

# अवती-भवती

शरद कृष्णन्

## □ उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री राम नरेश यादव

राज्य जनता पक्षाचे असो अथवा काँग्रेसचे असो– जी राज्ये कायमची कटकटीची म्हणून नोंदली गेली आहेत अशा राज्यांमध्ये उत्तर-प्रदेश आघाडीवर– बिहार, हरियाना यांचे क्रम त्यानंतर. उत्तरप्रदेश शासनाची सूत्रे आज राम नरेश यादव यांच्या हाती आहेत. पंत-नगरमधील अत्याचाराला त्यांच्याजवळ चांगले उत्तर नाही. विधान-सभेमध्ये त्यांच्या पक्षाचे प्रचंड बहुमत आहे. केंद्रस्थानीही त्यांच्याच पक्षाचे सरकार आहे. अशा परिस्थितीमध्ये वास्तविक सारे कसे अलबेल असायला पाहिजे; पण नाही. प्रत्यक्षात परिस्थिती गंभीर आहे! मंत्रिमंडळ मतभेदांनी पोखरले गेले आहे. मनात आल्याबरोबर कोणाशीही सल्लामसलत न करता मंत्रिमंडळामधील सहकाऱ्याला– मंत्रिमंडळातून वगळून– इतर मंत्रिगणांना धक्का देण्याचे तंत्र अव-लंबिण्याचे धाडस राम नरेश यादव यांनी दाखविले. त्या वेळी विरोधाची वावटळ काहीशी मंदावली होती; पण आता अझमगडची निवडणूक हरल्यापासून यादवजींच्या विरुद्ध पुन्हा आघाडी उभारली जात आहे. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्रिपद म्हणजे कसा जळता निखारा! एक गोविंद वल्लभ पंत यांचा अपवाद सोडल्यास ज्यांनी हा जळता निखारा हाती घेतला त्यांची चांगली होरपळ झाली. चौधरी चरण-सिंग, कमलापती त्रिपाठी, हेमवतीनंदन बहुगुणा, सी. बी. गुप्ता, सौ. सुचेता कृपलानी यांसारख्या मातब्बर मंडळींनाही राज्य खऱ्या अर्थाने पेलता आले नाही आणि बहुमत असो अथवा नसो– उत्तर-प्रदेशच्या मुख्यमंत्र्याला कधी शांतपणे झोप आली नाही! आता मुख्यमंत्रिपदी असलेल्या यादवजींना याच गोष्टीचा अनुभव येतो आहे.

यादवजी उत्तरप्रदेशचे सगळयात तरुण मुख्यमंत्री. आज त्यांचे वय आहे पन्नाशीच्या घरात. वास्तविक परिस्थिती अशी होती की, त्यांना हा जळता निखारा हाती घ्यायचे काहीही कारण नव्हते. मुख्यमंत्री होईपर्यंत ते फारसे कोणाला माहितीही नव्हते. ज्या अझमगढ पोटनिवडणुकीमध्ये यादवजींचे नातेवाईक राम बच्चन यादव यांनी जबर मार खाल्ला त्याच अझमगढमधून राम नरेश यादव नावाची फारशी परिचित नसलेली व्यक्ती निवडून आली. दिल्लीमध्ये भलेभले लोक लोकसभेमध्ये पाणी भरीत असताना यादवजींना केंद्रीय मंत्रि-मंडळामध्ये स्थान मिळण्याची शक्यता नव्हती. तथापी मंत्रिपद नसले म्हणून काय झाले? चांगली आबादाबातली खासदारकी तर सुर-क्षित होती! मग खासदारकीचा राजिनामा देऊन मुख्यमंत्रिपद आणि तेही उत्तरप्रदेशसारख्या त्रासदायक राज्याचे, स्वीकारण्याची गरज काय होती? या प्रश्नासंबंधी तसेच उत्तरप्रदेशच्या एकंदर राजकीय परिस्थितीबाबतची त्यांची मते त्यांच्या एका ताज्या मुलाखतीमध्ये पहावयास मिळतात. दैनिकात प्रसिद्ध झालेल्या मुलाखतीचा एक फायदा असतो. वाचकाला मजकूर जास्तीत जास्त ताजा वाचायला मिळतो. उत्तरप्रदेशचे सारेच राजकारण असे ढवळून निघत असताना दिल्लीच्या स्टेटस्मनने त्यांची जी मुलाखत प्रसिद्ध केली आहे ती वाचण्यासारखी आहे–

राम नरेश यादव हे नेमके आहेत तरी कसे? बोलघेवडे, समाज-वादीवर्गाचे आणि जातिपातींचे राजकारण करणारे राजकारणी? सतत संतप्त राहून आक्रमक व आग्रही भूमिका घेणारे नेते– जसे एके काळी प. बंगालचे विधानचंद्र रॉय होते तसे? छे, छे: यातले काहीच नाही! या माणसाला पाहिल्यावर उत्तरप्रदेशसारख्या संत्रस्त राज्याची धुरा याने आपण होऊन स्वीकारली असेल हे खरे वाटत नाही. भरपूर सदिच्छा, हाती घेतलेले काम नेटाने करण्याची वृत्ती असलेले हे मुख्यमंत्री स्वपक्षीयांनी माजविलेल्या बेदिलीला आणि विरोधी पक्षीयांनी डागलेल्या तोफांना तोंड देत आहेत आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे आमच्यासारख्या पत्रकारांना शांतपणे मुलाखतीही देत आहेत! मुलाखतीच्या भागाकडे वळण्यापूर्वी यादवजींसंबंधी थोडेफार लिहिणे जरूर वाटते. यादवजी जन्माने, वृत्तीने पुरेपूर शेतकरी. शेतकरी म्हणजे खरेखुरे शेतकरी! शेतमजुरांच्या श्रमावर जमीन-दारीची ऐट मिरवणारे नव्हेत. आमची बातचीत सुरू झाली तेव्हा यादवजी तसे कामात होते. मला असे सांगण्यात आले की, पंतनगर-मधील गोळीबाराबाबत ते राज्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करीत आहेत. मला वाटले होते आता कसली मुलाखत होणार? पण मला दिलेली वेळ पाळण्याचे सौजन्य त्यांनी दाखविले. ज्या प्रसन्न मुद्रेने त्यांनी माझे स्वागत केले त्यामुळे मी काहीसा चकित झालो. एक तर अतिशय कटकटीच्या विषयावरील चर्चासत्र अर्धवट सोडून ते आले होते आणि दुसरे असे की वृत्तपत्रांना सांगण्यासारखे काही नसल्याने मुलाखत स्वाभाविकपणे त्यांना अडचणीमध्ये टाकणारी होती आणि हे माहीत असूनही यादवजी हसतमुखाने मुलाखत देण्यासाठी सामोरे आले या गोष्टीचे अप्रूप मला वाटल्यावाचून राहिले नाही.

मनमोकळया भावनेने आणि हसतमुखाने त्यांनी माझे स्वागत केले असले तरी उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्रिपदाने त्यांना चांगल्यापैकी सतावले असले पाहिजे असाच माझा ग्रह झाला. त्यांचे वय तसे पन्नाशीचे; पण जबाबदारीचे ओझे पेलणे त्यांना जड जात असावे असे मला वाटले. जबाबदारीची जाणीव त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती आणि त्यामुळे असेल कदाचित; परंतु त्यांच्या खऱ्या वयापेक्षा मला ते जास्त मोठे वाटले आणि माझ्याशी ते निरनिराळ्या विषयांवर बोलू लागल्यावर ते पुष्कळसे अस्वस्थ आणि एकंदर परिस्थितीने निराश झाल्यासारखेही दिसले. मी त्यांना हरिजन– गिरिजन यांना राखीव जागा ठेवण्याबाबतचा प्रश्न विचारला. ते म्हणाले, 'या मंडळींना पुढारलेल्या जातीजमातींच्या पातळीवर आण-ण्याची जबाबदारी अखेर समाजाची असली तरी या बाबतची कृती मात्र शासनाला करावी लागते. पुढारलेल्या जाती-जमातींनी याबाबत फारसे हळवे होऊ नये. कारण तसा हा प्रश्न कायम स्वरूपाचा नाही. काही दिवसांनी या सोयी-सवलती निश्चितच बंद कराव्या लागतील.

पक्षामधील बेदिलीबाबत मी त्यांना छेडण्याचा प्रयत्न केला खरा; पण 'माफ करा या संदर्भात मी काहीही भाष्य करू इच्छित नाही.' असा खुलासा त्यांनी तत्परतेने केला. ते म्हणाले की, 'पक्षासमोर प्रश्न जरूर आहेत; परंतु अखेरीस तो आमचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. त्याबाबत जाहीर वाच्यता करणे बरे नव्हे. कृपा करून या पक्षांतर्गत बाबींपासून मला दूरच ठेवा!' आता आमच्या चर्चेला प्रश्नोत्तराचे स्वरूप येऊ लागले. मी विचारले.

प्रश्न : अझमगढ येथे एका मंत्र्याला पराभूत करून प्रचंड बहुमताने लोकसभेमध्ये गेल्यावर आपण पुन्हा राज्यपातळीवर येऊन, विविध प्रश्नांनी भेडसावणाऱ्या उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्रिपद का स्वीकारलेत?

उत्तर : उत्तरप्रदेशच्या पूर्वभागातील अझमगढ जिल्ह्यामधील एका गरीब शेतकरी कुटुंबामधून मी पुढे आलो. दारिद्र्य म्हणजे काय हे मी पुरेपूर पाहिले, अनुभविले. दारिद्र्य किती भीषण असू शकते याची अनेक जिवंत उदाहरणे माझ्या पहाण्यात होती. स्वतःच्या कुटुंबातील प्रिय व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठीही पैसे नसलेली माणसे मला भेटली. अन्न-वस्त्र-निवारा यांची ग्रामीण भागात दैना असते. तुम्हाला हे कदाचित फक्त ऐकून माहिती असेल, मी त्या साऱ्या यातनांतून स्वतः गेलो आहे. या माझ्या माणसांसाठी माझ्या समाजासाठी काही करता आले तर करावे असे माझ्या मनात फार होते. मुख्यमंत्रिपदाबाबत जेव्हा विचारणा करण्यात आली तेव्हा स्वतःच्या विचाराला आकार देण्याची हीच संधी आहे या भावनेने ही जबाबदारी मी स्वीकारली. माझ्या निर्णयाबाबत व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेचा थोडाफार भाग जरूर होता; परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे काही तरी करावे असे वाटत असताना संधी चालून आली ती मी पकडली.

प्रश्न : गेले दहा महिने आपण मुख्यमंत्री आहात! ठेवलेल्या अपेक्षा, योजलेली कामे याबाबत प्रत्यक्ष संधी मिळाल्यावर आपण काय करू शकलात?

उत्तर : एकंदर परिस्थिती सुरळीत आहे असे मी म्हटले तर बरोबर होणार नाही. अडचणी आल्या, येत आहेत; पण त्यांचे स्वरूप तुम्ही वर्तमानपत्रवाले अवाजवी मोठे करता. सध्या विरोधी पक्ष दंगेधोपे, मोर्चे, चळवळी, घेराओ यांसारख्या गोष्टीत लक्ष घालताना दिसतात. तथापी याही परिस्थितीला शासन यशस्वीरीत्या तोंड देऊ शकेल असे मला वाटते.

प्रश्न : आर्थिक धोरण ठरविताना आपण अग्रक्रम कशा प्रकारे निश्चित केला?

उत्तर : तसा आपला सारा देशच शेतकीप्रधान. त्यात विशेषतः उत्तरप्रदेश म्हणजे खरेखुरे शेतकीप्रधान राज्य. आता शेतकीप्रधान म्हणायचे आणि प्रत्यक्षामध्ये मात्र शेतीउद्योग कुठे तरी कोपऱ्यात नेऊन बसवायचा हे काही खरे नाही. शेवटी शेतीच खरी हे एकदा निश्चित केल्यावर आजवर पिछाडीला असलेल्या शेतीला आम्ही अग्रस्थान दिले. शेती-उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण जीवन डोळ्यांसमोर ठेवूनच आमची आर्थिक धोरणे आम्ही निश्चित केली. ग्रामीण भागात रोजगार वाढविण्याचे प्रयत्न केले. उद्योगधंदे केवळ शहरात केंद्रित झालेले दिसतात. आजवर झाले ते झाले; परंतु आता आणखी तरी नको हे आम्ही निश्चित केले आणि ग्रामीण भागात नवीन उद्योगधंद्यांना प्रोत्साहन दिले. गावातला माणूस गावातच बांधून ठेवायचा असेल तर त्याच्या पोटापाण्याचा प्रश्न जागवर सोडविला गेला पाहिजे असे आम्हाला वाटते आणि आम्हाला वाटते ते करण्याचा आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहोत.

प्रश्न : पक्षांतर्गत मतभेदांना सतत प्रसिद्धी मिळाल्यामुळे असेल कदाचित; पण लोक आज असे बोलताना दिसतात की, काँग्रेसचा गैरकारभार आणि तुमचा कारभार यात तसा काही फरक नाही.

उत्तर : असे कोणी म्हणत असेल, असे मला वाटत नाही; पण कोणी म्हणत असलेच, तर त्यांची नजर साफ नाही असे माझे मत आहे. काँग्रेसने केवळ आश्वासनांवर भागविले. आम्ही प्रत्यक्षात काही करून दाखवत आहोत. केवळ कोरडी सहानुभूती आणि प्रत्यक्ष कृती यातील फरक ज्याला समजतो, तो काँग्रेस शासनाची जनता शासनाबरोबर तुलना करणार नाही. हरिजनांना ज्या जमिनी देण्यात आल्या आहेत, त्या बाबत त्यांना आम्ही जास्तीत जास्त संरक्षण देतो. आर्थिक सहाय्य देतो. तथापि तरीही हरिजनांच्या तक्रारी वाढू लागल्या. आमच्या जमिनी समाजामधील वरिष्ठवर्गाकडून हिसकावल्या जातात अशी त्यांची मुख्य तक्रार होती. या तक्रारीचे निवारण व्हावे आणि हरिजनांच्या जमिनी बळकावणाऱ्यांना योग्य ती दहशत बसावी म्हणून आम्ही कायदा केला आणि अशा प्रकारे जमिनी बळकावणे हा दाखलपात्र गुन्हा ठरवून अशा गुन्ह्यांसाठी तीन वर्षांपर्यंतची शिक्षाही निश्चित केली. माझ्या माहितीप्रमाणे असा कायदा करणारे उत्तर प्रदेश हे पहिले सरकार आहे.

प्रश्न : राज्यामध्ये कायद्याचे राज्य नाही अशी जी ओरड सध्या करण्यात येते त्याबाबत आपले काय मत आहे?

उत्तर : कायद्याचे राज्य नाही असे म्हणणे उद्धटपणाचे आहे. राज्य कायद्याचेच आहे आणि कायदा चांगला शाबूत असून त्याची अंमलबजावणी व्यवस्थित चालू आहे. तथापि दुर्दैवाने काही उद्वेगजनक प्रकार घडले; परंतु जे घडले ते सर्व प्रसिद्ध झाले. काँग्रेसच्या जमान्यात हे शक्य नव्हते. पंतनगर किंवा कानपूर येथील स्वदेशी मिलमध्ये जे प्रकार घडले ते वास्तविक घडावयास नको होते. तथापि दुर्दैवाने काही प्रकार घडले. गझियाबाद, कानपूर येथील दंगलीमध्ये कामगारांना पद्धतशीरपणे चिथावण्यात येऊन हिंसाचारासाठी प्रवृत्त करण्यात आले. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी शासनाची असली तरी या संदर्भात विरोधी पक्षाचीही काही जबाबदारी आहे की नाही? आणि असल्यास विरोधी पक्ष जबाबदारीने वागतो की नाही हा खरा प्रश्न आहे! दुर्दैवाने आज या प्रश्नाचे उत्तर नकारात्मक असल्याने शासनाचे काम अवघड झाले आहे. तरीही याबाबत जेवढा गदारोळ उठवला जातो तेवढी परिस्थिती वाईट नाही. आणीबाणीच्या काळात जेवढे गुन्हे झाले त्यापेक्षाही गुन्ह्यांचे प्रमाण आता कमी आहे. त्यामुळे कायद्याचे राज्य नाही असे म्हणणारी मंडळी भ्रमात वावरत आहेत.

प्रश्न : गेल्या दहा महिन्यांत आपल्या शासनाने बजावलेली सर्वांत महत्त्वाची कामगिरी कोणती?

उत्तर : मला वाटते दुर्लक्षित ग्रामीण भाग आणि उपेक्षित शेती हा या राज्यापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होता आणि आर्थिक धोरणामध्ये सुसंगत बदल करून आम्ही ग्रामीण भागाला प्राधान्य देण्याचा जो प्रयत्न केला तीच आमची सगळ्यात महत्त्वाची कामगिरी

पृष्ठ १७ वर

# आझमगड

## इंदिरा विजयाचा अर्थ

### वा. दा. रानडे

कर्नाटकातील विजय ही श्रीमती गांधींच्या दक्षिण दिग्विजयाची नांदी ठरली तरच आझमगडचा विजय ही उत्तरेकडील विजयाची नांदी ठरणार आहे काय ? उत्तर प्रदेशातल्या तीन पोटनिवडणुकांनी हा प्रश्न देशापुढे उपस्थित केला आहे. त्यासाठी या निकालांचे अधिक सखोल विश्लेषण करायला हवे.

मतदानाचे प्रमाण पाहिले तर इंदिरा काँग्रेसचा विजय वाटतो तेवढा मोठा नाही. तिन्ही निवडणुकांत मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा कमी झालेले आहे. पोटनिवडणुकांत मतदान नेहमीच कमी होते याचे कारण एक-दोन जागा जिंकल्या काय किंवा हरल्या काय विधानसभा किंवा लोकसभेतील पक्षबळात त्यामुळे फरक पडून सरकार बदलण्याचा संभव नसतो हे खरे असले तरी आझमगडची निवडणूक प्रतिष्ठेची होती. इंदिरा गांधींनी दीड दिवसात अठरा भाषणे करून तडाखेबंद प्रचार केला होता. जनता पक्षाच्या वतीने अनेक केंद्रीय मंत्री प्रचारासाठी येऊन गेले. राजकीय कार्यकर्त्यांनी एवढा उत्साह दाखविला; पण मतदारांत ते उत्साह निर्माण करू शकले नाहीत. बहुसंख्य मतदार उदासीन राहिला. आझमगडमध्ये ४७ टक्के म्हणजे १९७७ पेक्षा दहा टक्के मतदान या वेळी कमी झाले. विजयी उमेदवार मोहसिना किडवाई यांना ४३ टक्के म्हणजे पन्नास टक्क्यांपेक्षा कमीच मते मिळालेली आहेत. सोरोन मतदारसंघात तर फक्त ३७ टक्के मतदान होऊन विजयी इंदिरा काँग्रेस उमेदवारास फक्त ३५ टक्के मते मिळाली. माणकपूर मतदारसंघात ४० टक्के मतदान झाले आणि विजयी इंदिरा काँग्रेस उमेदवारास ४९ टक्के मते मिळाली. पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मतदान या तीनपैकी एकाही मतदारसंघात झालेले नाही. तसेच एकाही मतदारसंघात विजयी इंदिरा काँग्रेस उमेदवारास पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळालेली नाहीत. लोकमत थोड्या प्रमाणात इंदिरा काँग्रेसकडे झुकले हे खरे; पण बहुसंख्य मतदार उदासीन राहिला हेच जनता पक्षाच्या पराभवाचे खरे कारण होय. काही आकड्यांनी हे स्पष्ट होईल.

आझम लोकसभा पोटनिवडणुकीत इंदिरा काँग्रेस उमेदवाराला १९७७ मधील काँग्रेसच्या मतांपेक्षा तीस हजार मते अधिक मिळाली. विजयी जनता उमेदवाराने १९७७ मध्ये दोन लाखांवर मते मिळवून काँग्रेसपेक्षा १,३७,००० मतांची आघाडी मिळविली होती. इंदिरा काँग्रेस या वेळी जनता पक्षावर फक्त पस्तीस हजार मतांची आघाडी मिळवू शकली. लोकमताचा लंबक फार मोठ्या प्रमाणात इंदिरा काँग्रेसकडे झुकलेला नाही. मतदानात दहा टक्के घट झाली याचा अर्थ सहा लाख मतदारांपैकी साठ हजार उदासीन राहिले. त्यात गेल्या वेळी ज्यांनी जनता पक्षाच्या बाजूने मते दिली होती त्यांपैकीच बहुसंख्य असले पाहिजेत. कारण आपल्या बाजूचे जास्तीत जास्त मतदान होईल असा प्रयत्न इंदिरा काँग्रेसने केला होता. या उदासीन मतदारांनी मते दिली असती तर जनता पक्षाचा विजय झाला असता.

सोरोन विधानसभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेसला जनता पक्षापेक्षा दोन-पाच हजार मतांची आघाडी मिळाली. इंदिरा काँग्रेस उमेदवाराला १९७७ मधील काँग्रेस मतांपेक्षा फक्त दोन हजार मते अधिक मिळाली आहेत. जनता पक्षाची मते मात्र अकरा हजारांनी घटली. जनता पक्षाच्या मतात ज्या प्रमाणात घट झाली त्या प्रमाणात इंदिरा काँग्रेसच्या मतात वाढ झाली नाही.

माणकपूर विधानसभा मतदारसंघात इंदिरा काँग्रेसचा उमेदवार आठ हजार मतांनी आघाडी मिळवून विजयी झाला. तेथे इंदिरा काँग्रेसला १९७७ मधील काँग्रेस मतांपेक्षा पाच हजार मते अधिक मिळाली. उलट जनता पक्षाच्या मतात एक हजाराची घट झाली. १९७७ मध्ये काँग्रेसने ही जागा १२३५ मतांच्या आघाडीने जिंकली होती. या वेळी ही आघाडी पाच हजारपर्यंत वाढली. जनता पक्षाचे बळ वाढले नसले तरी त्याच्या मतांत झालेली एक हजाराची घट फार मोठी म्हणता येणार नाही.

माणकपूर जागा काँग्रेसचीच होती; पण बाकीच्या दोन मतदारसंघांत जनता पक्षाचा पराभव मुख्यतः उदासीन मतदारांनी केला असे या आकड्यांवरून दिसते.

या तीन मतदारसंघातील १९६७ पासूनच्या निवडणुकांचा तुलनात्मक विचार केला तर बदलत्या मतप्रवाहाचे चित्र अधिक स्पष्ट होते. (सोबत तक्ता आहे.) आझमगढ लोकसभा मतदारसंघात केवळ याच वेळी ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले असे नाही. १९७१ च्या इंदिरा लाटेच्या काळातही ते यापेक्षा कमी म्हणजे ४५·५६ टक्के होते. १९६७ पासूनच्या चारही निवडणुकांत काँग्रेसला व आता इंदिरा काँग्रेसला मते ५० टक्क्यांपेक्षा कमीच मिळालेली आहेत. काँग्रेसला १९७१ मध्ये सर्वांत जास्त ५६ हजार मतांची आघाडी मिळाली. १९७७ ची निवडणूक जनता उमेदवाराच्या दृष्टीने अभूतपूर्व होती. मतदान सर्वांत जास्त ५७ टक्के झाले होते. विजयी उमेदवारास मते चारही निवडणुकांत सर्वांत जास्त ६४ टक्के मिळाली होती आणि १३७·००० मतांची आघाडी हाही चारही निवडणुकांतला उच्चांक होता. या पार्श्वभूमीवर १९७८ च्या पोटनिवडणुकीतील जनतापक्षाची घसरगुंडी विशेष प्रकर्षाने जाणवते. जनता उमेदवाराची मते २३८·९८५ वरून ९५·९४४ पर्यंत घटली म्हणजे त्यात १,४३,००० मतांची घट झाली; पण यातली फक्त ३० हजार मते काँग्रेसला मिळाली. काही थोडी इतर उमेदवारांना मिळाली असतील; पण बहुसंख्य मतदार उदासीन राहिले.

सोरोन मतदारसंघात या वेळी झालेले ३७

टक्के मतदान १९६७ पासूनच्या निवडणुकातील सर्वांत कमी मतदान आहे; पण १९७७ मध्येही ३८ टक्केच मतदान झाले होते. हा हरिजनांचा राखीव मतदारसंघ असला तरी तेथे १९७४ च्या निवडणुकीत सर्वांत जास्त ५४·८० टक्के मतदान झालेले होते. गेल्या दोन निवडणुकांतच ते खाली का आले याचा शोध घ्यायला हवा. सोरोनची जागा खरी विरोधी पक्षांची. १९६७ व १९६९ मध्ये जनसंघाने, १९७४ मध्ये भाक्रांदने आणि १९७७ मध्ये जनता पक्षाने ही जागा जिंकली होती. या वेळी मात्र इंदिरा काँग्रेसला ती प्रथमच मिळाली आहे. दलितांच्या आपणच कैवारी हे हरिजन मतदारांना पटविण्यात इंदिरा गांधींचा प्रचार यशस्वी झाला व मतदार त्यांच्या बाजूस झुकले; पण ते फार मोठ्या प्रमाणात झुकलेले नाहीत. इंदिरा काँग्रेसला फक्त ३५ टक्के मते मिळालेली आहेत; पण या मतदारसंघात ५० टक्क्यांपेक्षा जास्त म्हणजे ५२ टक्के मते फक्त जनसंघाला १९६९ मध्ये मिळाली होती. १९७७ मध्ये जनता उमेदवारास सुद्धा त्यापेक्षा कमी म्हणजे ४४ टक्केच मते मिळाली होती.

माणकपूर मतदारसंघात १९५७ मध्ये अपक्ष आणि १९६२ मध्ये स्वतंत्र पक्षाचा उमेदवार विजयी झाला होता; पण १९६७ पासून ही जागा काँग्रेसकडेच होती. या वेळी ती जागा इंदिरा काँग्रेसने जिंकली. सर्वांत जास्त मतदान ५९ टक्के १९६७ मध्ये झाले होते. १९६९ व १९७४ मध्ये ते घटले तरी ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त होते; पण गेल्या दोन निवडणुकांत मात्र ते ३६ व ४० टक्के एवढे खाली आले. मतदान एवढे कमी का झाले याचा अभ्यास होणे आवश्यक आहे. ही जागा काँग्रेसकडेच असली तरी काँग्रेसच्या पाठिंब्यात पडत गेलेला फरक लक्षात घेण्यासारखा आहे, १९६७ मध्ये ७३ टक्के मते काँग्रेसने मिळविली होती. बत्तीस व तेहेतीस हजारांच्या आघाडीने काँग्रेस उमेदवार निवडून आला होता. विरोधी पक्ष त्या वेळी किती दुबळे होते याची यावरून कल्पना येते; पण पुढच्या निवडणुकांत काँग्रेस विजयी झाली असली तरी तिला व आता इंदिरा काँग्रेसला ५० टक्क्यांपेक्षा कमीच मते मिळालेली आहेत. मतांची आघाडी तर १९७७ मध्ये १२३५ पर्यंत खाली आली होती.

या पोटनिवडणुकांत 'जनता' पक्षाचा पराभव का झाला याच्या कारणाची बरीच चर्चा झालेली आहे. त्यात नवे लिहिण्यासारखे काही नाही. 'जनता' पक्षातील घटकपक्षांनी आपसातील भांडणे थांबविणे, कारभारात अधिक कार्यक्षमता आणणे, जनतेच्या निकडीच्या प्रश्नांवर आणि दलितांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करणे आणि लोकशाही मार्गाने देशापुढील सर्व प्रश्न सोडविता येतात, जलद विकास साधता येतो हे आपल्या कारभाराने दाखवून देणे या गोष्टी 'जनता' पक्ष करू शकला तर त्याला अजूनही जनतेचा पाठिंबा मिळेल. उदासीन मतदार पुनः त्याच्या बाजूला झुकेल. मात्र या पराभवापासून योग्य धडा न घेता 'जनता' पक्षातील भांडणे चालूच राहिली तर मात्र आझमगड म्हणजे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली देशावर पुनः येऊ पाहणाऱ्या हुकुमशाहीची नांदी ठरेल. हा धोका टाळणे सर्व लोकशाहीवाद्यांचे कर्तव्य आहे. □

### उत्तर प्रदेश पोटनिवडणुका
### १९६७ पासूनचे तुलनात्मक चित्र

| वर्ष | मतदान | विजयी पक्ष | वि. उ. शेकडा मते | मतांची आघाडी |
|---|---|---|---|---|
| **आझमगड** | | | | |
| १९६७ | ५०·५९ | " | ३७·२८ | २१ हजार |
| १९७१ | ४५·५६ | " | ४७·४१ | ५६ हजार |
| १९७७ | ५७ | जनता | ६४ | १३७,००० |
| १९७८ | ४७·३१ | इं. काँ. | ४३ | ३५ हजार |
| **सोरोन** | | | | |
| १९६७ | ५१·१४ | जनसंघ | ३४·५२ | ४ |
| १९६९ | ४९ | जनसंघ | ५२ | ३३ हजार |
| १९७४ | ५४·८० | भाक्रांद | २५·४५ | ९०० शे. |
| १९७७ | ३८ | जनता | ४४ | ७ हजार |
| १९७८ | ३७ | इं. काँ. | ३५ | ५ हजार |
| **माणकपूर** | | | | |
| १९६७ | ५९·०६ | काँग्रेस | ७३·०८ | ३२ हजार |
| १९६९ | ५० | " | ७८ | ३३ हजार |
| १९७४ | ५३·३६ | " | ४६.२५ | ८ हजार |
| १९७७ | ३६ | " | ४४ | १२३५ |
| १९७८ | ४० | इं. काँ. | ४९ | ७ हजार |

कथा

# अपराधी - निरपराधी

### पु. ल. इनामदार

मी वकील ही कहाणी सांगत आहे. न्याय्य वा अन्याय्य कर्मांचा विचार केला जाऊन जेथे न्यायदान केले जाते अशा न्यायालयांच्या परिसरात आपला जीवनव्यवसाय करून मिळालेल्या अनुभवांवर आधारलेलीच ही कहाणी आहे. मी वेदान्तज्ञानी नाही किंवा वेदान्तचर्चेचा मला अधिकारही नाही, याची मला जाणीव आहे. तरी सत्य काय, असत्य काय; न्याय्य काय, अन्याय्य काय याचा जेथे पदोपदी विचार केला जात असतो त्या न्यायालयांतून वावरताना, तेथे होणाऱ्या न्यायदानाला मदत करण्याचा व्यवसाय करताना, मला पुष्कळदा मानवी मनाचे व्यापार समजून घेण्याची वेळ येई. माझा मीच प्रथम सत्य काय– असत्य काय, न्याय्य काय– अन्याय्य काय याचा निर्णय मनाशी घेऊन हाती आलेल्या प्रकरणाबद्दल कोणत्या हेतूने, कोणत्या दिशेने न्यायदानाला मदत करावयाची, आपली वकिली विद्या कशी वापरायची याचा आराखडा स्वतःशीच ठरवीत असे; अर्थात हे अंतःसाक्षी परमेश्वराला स्मरूनच आणि याच संदर्भात 'क्लैब्यं मास्म गमः पार्थ' असे सांगत अर्जुनाला प्रथम सांख्यबुद्धिविचार सांगून नंतर कर्मबुद्धि सांगणाऱ्या भगवान श्रीकृष्णांची शिकवण आठवावी लागे. गुरुजनांना, पितृजनांना सुद्धा ठार मारायला उद्युक्त करावयास अर्जुनाला सांगताना भगवानांनी दोन्ही बुद्धिज्ञानाची शिकवण दिली आहे. प्रचारकी थाटाने केवळ एकाच बुद्धिज्ञानातले विचार घेऊन 'क्षुद्रं हृदयदौर्बल्यं' सोडून देण्याची सांख्यबुद्धीची किंवा सत्य, अहिंसा, विषयासक्ती आदींच्या परिणामांचा विचार सांगत कर्मबुद्ध स्थितप्रज्ञाच्या दर्शनाची, सोंगाची शिकवण देण्याचा एकांगी प्रचार भगवानांनी केला नाही हे मला नेहमी जाणवत राहिले आहे. पितृजनांची, गुरुजनांची, बांधवांची हत्या करून कुरुक्षेत्रांवरचे कौरवकुलाचे महाभारत घडून गेल्यावरही अर्जुनाचा चेहरा सात्त्विक तेजोवलयाने तळपतच राहिला असला पाहिजे. कमीत कमी काजळून जाणे अशक्य होते. वेदपुराणांतल्या गोष्टी बाजूला ठेवून सध्याच्या कलियुगातही म्हणायला हवे की, मनुष्याची बुद्धीच त्याचे सोंग सजविते. माणसाकडे, त्याच्या शारीरिक हालचालींकडे, त्याच्या चेहेऱ्याच्या भावदर्शनाकडे बघताच त्याच्या मनःस्थितीचे पुष्कळसे चित्र समजता येते, असे मला नेहमी वाटत राहिले आहे. न्यायालयात येणाऱ्या निरनिराळ्या न्यायप्रार्थी लोकांकडे बघताना हे मला फारच जाणवले आहे. अशाच काही विचारसंदर्भातली ही अनुभवांची सत्यकथा आहे.

माझ्या वकिली व्यवसायचरित्रातली आरंभीच्या दिवसांतलीच गोष्ट आहे. मी वकिलीचे काम ज्येष्ठ नी श्रेष्ठ वकीलबंधूंच्या कामाकडे बघून, न्यायाधिशांच्या न्यायदानपद्धतीकडे बघून, आपल्या कामाची पद्धती कशी असावी याचे धडे घेत होतो. त्या वेळी मी काम शिकत असलेल्या न्यायालयातल्या उच्चश्रेणीच्या न्यायमंचावर एक न्यायाधीश विराजमान होते. ते माझ्यापेक्षा दोनचार वर्षांनीच वडील असावेत. इंग्लंडमध्ये राहून कुठल्याशा विद्यालयाची एलएल्. एम. ची पदवी घेऊन आलेले; परंतु त्यापेक्षाही अधिक व्यवहारज्ञान आपल्या वडिलांपासून वारसाने मिळविलेले होते. कारण त्यांचे वडील स्वतः आंग्लविद्यापदवीविभूषित न्यायशास्त्री नसूनही न्यायव्यवहारशास्त्राचे सम्यक्ज्ञान असलेले व्यवहारचतुर पंडित होते. त्या न्यायालयात प्रचलित असलेले अनेक कायदे त्या वडीलमहाशयांनी बनविलेले होते. ते होते इंग्रजी कायदेनियमांवरून आधारलेलेच; पण त्या इंग्रजी कायद्यांचा भारतीय आविष्कार बघून मला भारतीय बुद्धीचे कौतुक वाटत असे. चिरंजीव न्यायाधीश न्यायासनावर बसून पितृगौरवापेक्षा पित्याचे व्यवहारशास्त्रज्ञान आठवताना पाहून आम्हा वकिलांना शिक्षणाबरोबर मनोरंजनाचाही लाभ होत असे. त्या चिरंजीव न्यायाधीशमहोदयांची नेहमीची दोन तऱ्हेची वागणूक समजण्याचा मी प्रयत्न करी. एक तर ते स्वतः कोर्टासमोर असलेल्या प्रकरणांच्या फायलीला हातसुद्धा लावायचे नाहीत. सगळी फाइल स्वतःच्या विश्वासाच्या शिरस्तेदाराकडून उघडच्या न्यायालयात दोन्ही बाजूंच्या वकिलांसमक्ष व पक्षकारांसमक्ष वाचवून घेत व ते सर्व उघडच्या कानांनी ऐकत असताना उघडच्या डोळ्यांनी संबंधित पक्षकाराकडे किंवा वकिलाकडे निरखून बघत असायचे. स्वतः हातात लेखणी घेऊन पटलेले किंवा न पटलेले मुद्दे टिपून घेण्याचे कष्ट ते क्वचित करीत. अशा थाटात समोर आलेल्या प्रकरणाची माहिती करून घेण्याचे काम संपले की, मग चिरंजीव न्यायाधीशमहोदयांनी वकिलांना म्हणावे, 'समझ गया मैं, अब कहिये वकीलसाहाब, आपका क्या कहना है?' किंवा वकील नसलेल्या पक्षकाराला किंवा अभियुक्ताला (आरोपीला) म्हणावे, 'क्या तुमको और कुछ कहना है?' या प्रश्नांची वकिलांनी किंवा पक्षकारांनी दिलेली उत्तरे ऐकताना देखील त्यांची दृष्टी वकिलाच्या चेहेऱ्याकडे व विशेषतः पक्षकार अभियुक्ताच्या चेहेऱ्याकडे खिळलेली असायची. ते शांतपणे सर्व ऐकून घेत, दाखविलेले इंग्रजी, भारतीय न्यायदृष्टान्तही ऐकून घेत, पाहून घेत. ही सगळी सुनवाईची क्रिया संपली– पक्षकारांचे– वकिलांचे म्हणणे संपले की, लघुलेखकाला बोलावून निर्णय सांगायला सुरुवात करीत. त्यांच्या याच दृष्टिपरीक्षणाच्या संदर्भातले त्यांचे

पृष्ठ १८ वर

रेड ब्रिगेड ही इटलीतील सर्वांत निष्ठुर, सुसंघटित आणि श्रीमंत संघटना समजली जाते. पंधरा दिवसांपूर्वी झालेल्या पंतप्रधान अल्डो मोरो प्रकरणात या संघटनेचा हात होता. यासारख्याच इतर काही दहशतवादी संघटनांचा हा थोडक्यात परिचय.

# ....यांचे उद्दिष्ट एकच....संपूर्ण क्रांती

**डॉ. श्रीकांत मुंदरगी**

ती इटलीतील एक सुरेख सकाळ होती. रस्त्यावरून तुरळक गाड्या धावत होत्या. घड्याळाचे काटे नऊ वाजल्याचे दर्शवीत होते. अशा प्रसन्न वेळी इटलीचे माजी पंतप्रधान श्री. अल्डो मोरो... वय ६१ वर्षे...रोममधील सॅन फ्रॅन्सेस्को या चर्चमधून प्रार्थना आटोपून बाहेर पडले. आपल्या गाडीच्या मागच्या बाजूस बसून ते ताजी वर्तमानपत्रे चाळू लागले. गाडी पार्लमेंटच्या दिशेने वेगाने धावू लागली. त्या गाडीच्या मागून येणाऱ्या गाडीत त्यांचे रायफली व मशीनगन्स घेतलेले शरीररक्षक होते. अल्डो मोरोंच्या चतुर राजनीतीमुळेच इटलीच्या डळमळित व अस्थिर राजकारणाला थोडेफार स्थैर्य लाभले होते. नजीकच्या भविष्यकाळात अल्डो मोरो यांच्यावर राष्ट्राची धुरा येऊन पडणार याची रास्त जाणीव इटलीला झाली होती. कारण दहशतवादांनी वैतागलेल्या व आर्थिक विपन्नावस्थेच्या कड्यावर उभ्या असलेल्या राष्ट्राला शांतता व सुबत्ता देण्याचे सामर्थ्य असणारा इतका विचारवंत व परिपक्व नेता आज इटलीत मोरोशिवाय दुसरा नाही, हे नाकारता येण्यासारखे नव्हते.

...आणि अचानक समोरून भरधाव येणाऱ्या एका छोट्या गाडीशी होणारी टक्कर चुकविण्यासाठी मोरोंच्या ड्रायव्हरने ब्रेक्स लावून गाडी बाजूस वळविण्याचा प्रयत्न केला त्या वेळी त्याला जे दृश्य दिसले त्याने तो भयचकित झाला ! समोर येऊन थांबलेल्या गाडीतून उतरलेल्या दोन माणसांनी स्वयंचलित बंदुकीतून त्याच्यावर गोळ्यांचा वर्षाव केला. मृत्यूने त्याला कसलाही विचार करू दिला नाही. मागच्या गाडीतील सुरक्षा अधिकाऱ्यांनाही आपल्या बंदुका सावरण्यास सवडच मिळाली नाही. कारण मागून आलेल्या अल्फा रोमिओ गाडीतील दोन माणसांनी त्यांचे दोन क्षणातच मशीनगनने मुडदे पाडले ! लाल केसांच्या एका तरुणीने पिस्तूल दाखवीत आज्ञा सोडल्या व काय होत आहे हे कळायच्या आतच अल्डो मोरो यांना जबरदस्तीने दुसऱ्या गाडीत कोंबण्यात आले व ती गाडी भरधाव वेगाने निघून गेली ! जवळच्याच एका इमारतीतून पाहणाऱ्या एका स्त्रीने नंतर सांगितले की, हा सारा प्रकार काही सेकंदांतच घडला. लगेच तिने फोनकडे धाव घेतली; परंतु फोन बंद पडला असल्याचे तिच्या लक्षात आले. त्या वेळी त्या भागातील आसपासचे सर्व फोन्स बंद होते ! चाळीस मिनिटांत सर्व रोमची नाकेबंदी करण्यात आली; पण अल्डो मोरो व त्यांचे अपहरणकर्ते त्यांच्या गाडीसह जणू धुक्यात विरून गेले होते !

...गेली आठ वर्षे इटलीत दहशतवाद्यांनी धुमाकूळ घातला आहे. शांतताप्रिय, भोजनप्रिय व लोकशाहीनिष्ठ अशा इटालियन जनतेला या भयानक हिंसाचाराने पूर्णपणे हवालदिल करून सोडले आहे. मोठमोठ्या शहरांत वावरणाऱ्या नागरी दहशतवादी संघटनांनी घातलेल्या हैदोसामुळे इटलीच्या दाराशी यादवीयुद्ध येऊन ठेपले आहे. जवळजवळ २०० च्या आसपास असलेल्या या संघटनांपैकी ११५ अतिशय डाव्या विचारसरणीच्या तर २१ अतिशय उजव्या विचारसरणीच्या आहेत. इतर संघटना स्वतंत्र विचारवादी आहेत असे मानले जाते. या भिन्न राजकीय दहशतवादी संघटनांचे उद्दिष्ट एकच...संपूर्ण क्रांती...व ते साधण्यासाठी कोणत्याही हिंसाचारी मार्गाचा अवलंब करणे त्यांना वावगे वाटत नाही.

इटलीत गेल्या वर्षात ७६ लोकांना पळविण्यात आले. ७५ साली ६२ व ७६ साली ४२ लोकांना पळविण्यात आले होते. त्यातील निम्म्याच्यावर लोक परत कधीच दिसले नाहीत ! बाकीच्यांना मोठमोठ्या रकमांच्या मोबदल्यात सोडविण्यात आले. अपहरणाचे बहुतेक बळी उद्योगपती, धनिक, मोठमोठे सरकारी ऑफिसर्स, राजकीय पुढारी व वार्ताहर अशांपैकीच होते.

७७ सालात २१२८ हून अधिक हिंसाचारी घटना इटलीत घडल्या. त्यात गोळीबार, भोसकाभोसकी इत्यादि अनेक प्रकार असून त्यात अनेक निरपराध लोक जखमी वा मृत झाले आहेत. ७८ सालात आतापर्यंत ७९२ पेक्षा जास्ती हिंसाचाराचे प्रकार घडले असून त्यात १०० लोक मरण पावले.

अल्डो मोरो यांना पळविणारी व सर्व इटलीभर दहशतीचे वातावरण निर्माण करणारी 'रेड ब्रिगेड' ही संघटना देशातील इतर कोणत्याही दहशतवादी संघटनेपेक्षा सामर्थ्यवान, निष्ठुर, सुसंघटित व श्रीमंत संघटना समजली जाते. अनेक बँका लुटून व अपहरणापोटी प्रचंड रकमांचा मोबदला घेऊन अक्षरशः सोन्यात लोळणारी ( Rolling in Gold ) ही संघटना इटालियन सरकार व जनता यांची डोकेदुखी होऊन बसली आहे. रेनॅटो करसीओ ऊर्फ पिप्पो या तरुणाने हायस्कूलमध्ये असतानाच 'रेड ब्रिगेडची' स्थापना केली.

त्याच्यावर प्रेम करणारी मार्गेरिटा कॅगोल हिला सारे पिप्पा म्हणत. पिप्पाने अखेर पिप्पोला जाळ्यात पकडले. गेल्या ४-५ वर्षांत या इटालियन बॉनी क्लाईडने ( अमेरिकेत अनेक बँका लुटून निष्ठूरपणे मुडदे पाडणारे कुप्रसिद्ध जोडपे ) अक्षरशः धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली.

१९७५ साली मॉनफेरॅटोच्या तुरुंगात शिक्षा भोगीत असलेल्या आपल्या नवऱ्याला-पिप्पोला-सोडविण्यासाठी पिप्पाने धाडसी योजना आखून त्याला मुक्त केले; पण त्यांच्या पाठलागावर असलेल्या इटालियन पोलिसांशी झालेल्या चकमकीत अखेर पिप्पा बळी पडली. तिच्या मृत्यूमुळे संतापाने वेडया झालेल्या पिप्पोने ' मारा कॉलम ' नावाची एक निष्ठूर व जिवावर उदार झालेल्या धाडसी दहशतवाद्यांची खास तुकडी बनविली आणि या तुकडीने काही काळ इटालियन पोलिसांना त्राहि भगवन करून सोडले !

'रेड ब्रिगेड'च्या संघटनेत मध्यमवर्गातील अनेक तरुण मुले आहेत. मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव असलेली, पण सोव्हिएट-धार्जिण्या कम्युनिस्टांचा द्वेष करणारी ही तरुण मंडळी आहेत. कम्युनिस्टांच्या देश विकणाऱ्या मनोवृत्तीचा त्यांना मनस्वी तिटकारा आहे. १९७२ साली भूमिगत झालेल्या या संघटनेत अनेक युनियन-लीडर्स व गुन्हेगारही सामील झाले आहेत; पण या संघटनेत बहुतांशी तरुण, कडवे व बेकारीला कंटाळलेले विद्यार्थीच अधिक आहेत.

पिप्पो व त्याचे १५० हून अधिक सहकारी टूरीन येथे तुरुंगात असून त्यांच्यावर खून, लुटालूट, दहशतवाद इ. अनेक आरोपांखाली खटले भरण्यात आले आहेत. अल्डो मोरो यांना पळविण्यात या नेत्याची त्याच्या सहकाऱ्यासह सुटका करणे हा मुख्य उद्देश आहे. पिप्पोच्या अनुपस्थितीत रेड ब्रिगेडच्या नेतृत्वाची जबाबदारी कोरॅडो अल्युनी या ३० वर्षांच्या रोमन तरुणावर आलेली आहे. पिप्पोपेक्षा कांकणभर अधिकच धाडसी व क्रूर असलेल्या या तरुणाची इटलियन पोलिसांना विलक्षण धास्ती पडली आहे. अल्डो मोरोसारख्या इटालीतील सर्वांत लोकप्रिय व सर्वश्रेष्ठ नेत्याला पळवून नेऊन रेड ब्रिगेडच्या नव्या नेत्याने इटलीत राजकीय इतिहासच घडविला आहे.

टूरिनच्या मेयरवर-गियोव्हॅनी पिक्को-इटलीतील एक नावाजलेला राजकारणी पुढारी..... याच्यावर मार्चमध्ये करण्यात आलेल्या हल्ल्याची जबाबदारी रेड ब्रिगेडने स्वीकारली आहे. गंभीर जखमी झालेला पिक्को टूरीनच्या इस्पितळात उपचार करून घेत आहे. आपण वाचलो यातच आपण नशीबवान आहोत असे तो समजतो.

अफाट पैसा, विलक्षण प्रसिद्धी, राजकारणात मानाचे स्थान, समाजात मिळणारा मान यापैकी कोणतीही एक गोष्ट असलेला माणूस आज इटलीत समाधानाचे व शांततेचे जीवन उपभोगू शकत नाही. उद्योगपती अन् कारखानदार यांनी तर आपल्याभोवती सुरक्षा-व्यवस्थेचे जाळेच विणून घेतले आहे. अपहरणाची भावना डोक्यावर केसाने टांगलेल्या तलवारीप्रमाणे श्रीमंत माणसाला सतत भीतीच्या दडपणाखाली ठेवीत असते. अनेकांनी आपले भांडवल स्वित्झर्लंड, अमेरिका, फ्रान्स, स्वीडन, बेल्जियम व ब्रिटन येथे गुंतविण्यास सुरुवात केली आहे. अनेक इटालियन कुबेर वर्षातील ११ महिने उद्योगधंदे व कामाच्या निमित्ताने परदेशांत हिंडत असतात. प्रसिद्ध अभिनेत्री सोफिया लॉरेन व तिचा पती श्री. कार्लो पाँटी यांनी इनकम् टॅक्सच्या त्रासामुळे इटली सोडली आहे असा समज पसरविला गेला असला तरी आपल्या मुलांना पळविण्यात येईल ही भीती या त्यांच्या परदेशगमनामागे आहे हे कारण अधिक संयुक्तिक वाटते. दहशतवादाच्या धास्तीमुळे सामान्य माणसालासुद्धा जीवन जगणे मुष्किल होऊन बसले आहे. शहरात रस्त्यावर केव्हा, कोठे व कधी गोळीबार, हाणामारी, लुटालूट, बॉम्बस्फोट वा पळवापळवी होईल हे सांगता येत नाही. महागाई, बेकारी, राजकीय अस्थिरता या सर्वांवर कळस चढवून दहशतवादाने इटलीच्या लोकशाहीला खिळखिळे करून टाकले आहे. त्यामुळेच इटलीत लष्करी सत्ता आल्यास तिचे स्वागत करण्यास अनेक विचारवंत तयार होतील. भारतात अप्रिय झालेल्या आणीबाणीची खरी जरुरी आज इटलीला आहे असे तेथील शांतताप्रेमी मंडळींना वाटते. अल्डो मोरोंच्या अपहरण - खून याचा प्रश्न कशा रीतीने सुटतो यावर इटलीचे राजकीय भवितव्य बऱ्याच अंशी अवलंबून आहे.

इटलीत परिस्थिती अगदी विकोपाला गेली आहे आणि इतर सर्व राष्ट्रांत आबादीआबाद आहे असे समजणे चुकीचे ठरेल.

१९१६ च्या डब्लीनच्या बंडानंतर ब्रिटनने १६ बंडखोरांना गोळ्या घातल्या तेव्हा विल्यम यीट्स् या कवीने यथार्थ भविष्य-वाणी केली.

O but we talked at large before
The sixteen men were shot

But who can give & take
What should be & what not
While those dead men are loitering there
To stir the boiling pot ?

इस्रायलच्या निरपराध स्त्रियामुलांची हत्या करून पॅलेस्टाइनियन गनिमांनी वासरू मारले अन् त्याचा बदला घेण्याच्या इराद्याने इस्रायलने दक्षिण लेबाननवर हल्ला करून हजारो निरपराधांचे (त्यात काही दहशतवादी असतीलही) बळी घेऊन गाय मारली ! सूडाचे हे सत्र संपणार कसे अन् केव्हा ? सुक्याबरोबर ओले जळते आहे. काटयाने काटा काढावा ही नीती आता जुनी होत आहे. या नीतीने मूळ प्रश्न सुटणार नाहीत. दहशतवादाची ही आग साऱ्या जगाला ग्रासू पाहते आहे. जगभर पसरलेल्या काही अतिशय महत्त्वाच्या दहशतवादी संघटनांची ही संक्षिप्त माहिती.

**आनंदमार्ग** — आनंदरंजन सरकार या तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगीत असलेल्या रेल्वेखात्यातील सामान्य कारकुनाने सुरू केलेल्या या संघटनेचे आज आठ लाख सभासद आहेत ! त्यांपैकी दहा टक्के दहशतवादी असून अलीकडे झालेल्या ऑस्ट्रेलिया, इंग्लंड वगैरे देशांतील

## ही परिस्थिती फक्त इटलीतच आहे असे नसून इतरही देशात....

राजकीय दूतांवरचे हल्ले, राजकीय नेत्यांना देण्यात आलेल्या धमक्या इ. गोष्टींमुळे आनंदमार्ग चर्चेत आहे.

**आयरिश रिपब्लिकन आर्मी** — उल्स्टर व आयर्लंड येथे या संघटनेने आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी १९६९ पासून आजवर ५००० पेक्षा अधिक बॉम्बहल्ले व अनेक हत्या केल्या आहेत. अमेरिकन आयरिशांनी आर्थिक मदत कमी केल्यामुळे आता ही संघटना दुर्बळ होत चालली आहे. आयर्लंडच्या स्वातंत्र्याची चळवळ दडपून टाकणे ही गोष्ट अजून तरी ब्रिटनला शक्य झालेली नाही.

**रेड आर्मी फॅक्शन** — पश्चिम जर्मनीत फोफावणारी ही दहशतवादी संघटना बादर, इसेलिन व रास्प यांच्या आत्महत्या व लुफ्तांसा विमानाचे अपहरण व त्याची मुक्तता या घटनांनी जगभर गाजली. अनेक वैफल्यग्रस्त जर्मन तरुण-तरुणींनी अरब राष्ट्रात जाऊन दहशतवादाचे शिक्षण घेऊन इस्रायलच्या विरुद्ध अनेक कारवाया करण्यास सुरुवात केली आहे. हिटलरने लावलेल्या द्वेषाच्या वृक्षाची ही विषारी फळे आहेत. हॅन्स मार्टिन श्लेयर या जर्मन उद्योगपतीचे अपहरण व हत्या यालाही ही संघटना जबाबदार धरली जाते.

**जपानची लाल सेना** — पश्चिम युरोप व लेबानन येथे स्थायिक झालेल्या मूठभर जपानी तरुणांनी आपल्या भयानक कृत्यांनी साऱ्या जगाला दहशत बसविली आहे. १९७२ साली इस्रायलच्या लाड्च्या विमानतळावर या तीन लाल सैनिकांनी २६ निष्पाप प्रवाशांची बेछूट हत्या करून इस्रायलला हादरा दिला. शांतिदूत बुद्धदेवाच्या देशातील या रहिवाशांनी जपानचे एक विमान पळवून ६० लाख डॉलर्सची खंडणी व ६ सहाध्यायांची मुक्तता या बदल्यात ते विमान व त्यातील १५१ ओलितांना मुक्त केले. या सेनेचा पुढारी फुसाको शिगेतोबू हा बैरूतमध्ये आपली संघटना वाढविण्याचे काम करतो आहे.

**फाल्न** — न्यूयॉर्क येथे भूमिगत कार्य करणाऱ्या या संघटनेच्या सभासदांनी पोर्टे रिकोच्या स्वातंत्र्याची मागणी अमेरिकन सरकारने मान्य करावी म्हणून आजवर अमेरिकेतील सर्व मोठ्या शहरांत शेकडो वेळा बॉम्बस्फोट केले आहेत.

भांडवलशाही सरकार विरोधी जागतिक संस्था-अज्ञात ठिकाणी कार्य करणाऱ्या या रहस्यमय संघटनेने अलीकडे गाजलेल्या लुफ्तांसा विमानाच्या अपहरणाचे श्रेय स्वतःकडे घेतले आहे. ही संघटना अरब देशातच कार्यान्वित होत असावी.

**दक्षिण मोलुक्कन्स** — इंडोनेशियाच्या जोखडाखालील दक्षिण मोलुक्कोला हॉलंडने मुक्त करून स्वातंत्र्य मिळवून द्यावे म्हणून हॉलंडमध्ये धुमाकूळ घालणाऱ्या या संघटनेने काही वर्षांपूर्वी हॉलंडमधील एका रेल्वेचे अपहरण केले व त्याच वेळी एका प्राथमिक शाळेचा ताबा घेतला. दोन महिन्यांपूर्वी त्यांनी केलेल्या दहशतवादी कृत्याची आठवण ताजीच आहे.

**कोरू** — मियामी येथे कॅस्ट्रोचा द्वेष करणाऱ्या मूठभर क्यूबन तरुणांनी ही संघटना निर्माण केली आहे. CIA चा तिला सक्रिय पाठिंबा आहे असे मानले जाते. आर्लंडो बॉश या त्यांच्या नेत्याने बॉम्बने एक क्यूबाचे जेट त्यातील ७३ उतारूंसकट उडविल्याबद्दल सध्या तो क्यूबा येथे तुरुंगात आहे. क्यूबा कॅस्ट्रोच्या जोखडाखालून मुक्त करणे हे यांचे स्वप्न आहे.

**रेड ब्रिगेड** — इटलीत अनेक राजकीय हत्या, शेकडो धनिक, उद्योगपती व राजकीय पुढाऱ्यांना ज़बरदस्तीने पळविणे व त्या बदल्यात पैसा मिळविणे, मोठमोठ्या राजकीय व औद्योगिक इमारतीत बॉम्बस्फोट घडविणे व राजकीय अराजक माजविणे यामुळे इटालीच्या सामान्य व शांतताप्रेमी जनतेला अस्थिरता आली आहे. अस्वास्थ्य, बेकारी, महागाई व तत्त्वांचे संघर्ष यातून निर्माण झालेल्या या दहशतवादी संघटनेचे अंतिम उद्दिष्ट काय आहे हे मात्र अज्ञात आहे.

**कार्लोस** — युरोपमध्ये 'द जॅकल' या नावाने गाजलेल्या तरुणाचे मूळ नाव इलिच रमीरेझ सँचेझ. याची स्वतःचीच संघटना असून त्याने अगणित बॉंबस्फोट, अपहरणे व हत्या केल्या आहेत. लॅटिन अमेरिकन देशातील या तरुणाने रशियात कम्युनिझमचे व अरब देशात दहशतवादाचे धडे घेतले आहेत. अरब तेलमंत्र्यांच्या परिषदेवर (OPEC) हल्ला करून साऱ्या अरब जगाचा थरकाप उडविणाऱ्या या कार्लोसनेच एंटेबीच्या प्रसिद्ध विमानअपहरणाची आखणी इडी अमीनच्या सहाय्याने केली होती, असे म्हटले जाते. जगातील हजारो पोलिससंघटनांना चकविण्यात अजून तरी तो यशस्वी झाला आहे.

**पॅलेस्टाइन मुक्तिसेना** — मुख्यत्वे लेबानन व इराकमध्ये कार्यान्वित असणाऱ्या या मूळ संघटनेचे आता विभाजन झाले असून त्याच्या अनेक शाखा स्वतंत्रपणे काम करतात. जगातील सर्वांत मोठी क्रूर, निष्ठुर व साहसी संघटना म्हणून तिचा जगातील दहशतवाद्यांकडून गौरव केला जातो.

**पी. एफ्. एल्. पी.** — पॉप्युलर फ्रंट फॉर दी लिबरेशन ऑफ पॅलेस्टाइनचे सभासद २००० हून अधिक आहेत. ते कट्टर व जहालमतवादी आहेत. मध्यपूर्वेत १९६८ मध्ये पहिले विमान अपहरण करून अपहरणाची मालिका सुरू करण्याचे श्रेय या संघटनेकडे जाते. पॉप्युलर डेमॉक्रेटिक फ्रंट फॉर दी लिबरेशन ऑफ पॅलेस्टाइन व पी. एफ्. एल्. पी. जनरल कमांड अशा हिच्या दोन उपशाखा आहेत.

जॉर्ज हबाशचे नेतृत्व या साऱ्यांना मान्य आहे; पण यातून फुटून निघालेल्या वाडीक हद्दादने स्थापलेल्या अधिक कडव्या दहशतवादी संघटनेने एंटेबीच्या प्रसिद्ध अपहरणात भाग घेतला होता असे मानले जाते. म्युनिच येथे ऑलिंपिकच्या इस्रायली खेळाडूंवर हल्ला करणारी व १९७० साली ५ विमानांचे अपहरण करणारी ब्लॅक सप्टेंबर

ही संघटना आजकाल दुर्बल झाली आहे असे मानतात. यासर आराफत हा पॅलेस्टाइन मुक्तिचळवळीचा कर्णधार समजला जातो. जगातील अनेक दहशतवादी संघटनांची ही मूळ जननी आहे असे मानणे अयोग्य ठरणार नाही.

स्वॅपो (SWAPO) – ऱ्होडेशियाच्या व दक्षिण आफ्रिकेच्या गोऱ्या राज्यकर्त्यांविरुद्ध लढणाऱ्या या काळ्या गोरिलांच्या संघटनेने आजवर २०,००० हून अधिक बळी घेतले आहेत !

**इस्राएल अँटिटेररिऑरिस्ट ऑर्गनायझेशन** – शठं प्रति शाठ्यं या न्यायाने पॅलेस्टाइन दहशतवाद्यांना सतत धाकात ठेवणारी व दुसऱ्या महायुद्धातील क्रूर नाझी युद्धगुन्हेगारांना शासन करणारी कडव्या इस्राएली लोकांची संघटना. कित्येक वर्षांपूर्वी अणुबाँब बनविण्यासाठी भारित् युरेनियम (Heavy water) घेऊन जाणारी एक अख्खी अमेरिकन बोट महासागरातून पळवून इस्रायलला नेऊन साऱ्या जगाला आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या या संघटनेचा जगात विलक्षण दबदबा आहे.

आंतरराष्ट्रीय हिंसाचाराच्या दिंडीतील दहशतवादाची पालखी वाहण्यात वरील संघटनांचा पुढाकार असला तरी इतर वारेकऱ्यांची संख्याही बरीच मोठी आहे. या कथा झाल्या व्यापक दहशतवादाच्या ! पण वैयक्तिक व स्थानिक दहशतवादसुद्धा काही कमी प्रमाणात बोकाळलेला नाही ! अनेक वर्षांपूर्वी लडन येथे वेश्याव्यवसाय करणाऱ्या बऱ्याच स्त्रियांना ठार मारून त्यांची आतडी बाहेर काढणाऱ्या आधुनिक नारसिंहाला... जॅक दी रिप्पारला पकडण्यात तेथील पोलीस कधीच यशस्वी झाले नाहीत. त्याची गादी चालविणारे अनेक शिष्य आजचा जमाना गाजवीत आहेत. फुटपाथवर निद्रेची आराधना करणाऱ्या अनेक निष्पाप व गरीब जीवांना यमसदनास पाठविणाऱ्या रामन राघवनची कथा साऱ्यांना ज्ञात आहेच! बोस्टन स्ट्रँगलरने अनेक तरुणींना गळा आवळून निजधामास पाठविले, तर ७७ सालात न्यूयॉर्कसारख्या समृद्ध शहरात अनेक तरुण जोडप्यांवर '४४ च्या बुलडॉग रिव्हॉल्वरने खुनी हल्ले करून पाच तरुणी व एक तरुण यांना ठार करणाऱ्या व इतर अनेकांना गंभीर जखमी करणाऱ्या 'सन ऑफ सॅमने' इतके भीतिदायक वातावरण निर्माण केले होते की, रात्री आठनंतर सदैव गजबजणारे मॅनहॅटनचे रस्ते निर्मनुष्य दिसू लागले होते. महत्प्रयासानंतर डेव्हिड बर्कोव्हिटज या २४ वर्षांच्या देखण्या तरुणाला पकडून सन ऑफ सॅम प्रकरणाचा शेवट करण्यात आला. युगांडाच्या दादा अमीनने चालविलेल्या क्रूर व निष्ठुर दादागिरीचे बळी लाखाच्या घरात आहेत ! बंगलादेशच्या शेख मुजीबरला व अफगाणिस्थानच्या दाऊदला त्यांच्या बायकांमुलांसह निष्ठुरपणे मारून साऱ्या जगातील नेत्यांच्या मनात दहशत निर्माण करणारे हे नवे पुढारी त्या त्या देशात स्वर्ग निर्माण करू शकतील काय ?

दहशतवाद मग तो स्थानिक असो, आंतरराष्ट्रीय असो वा आंतरदेशीय असो, सामुदायिक असो वा वैयक्तिक असो अखेर त्याचे फळ काय ? दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या या हिंसाचाराला वेळीच आळा घालण्यात आला नाही तर हा वडवानल साऱ्या जगाला जाळून टाकील यात शंका नाही ! वर्णवर्चस्वाच्या बुरसट कल्पना सोडून भिन्नवर्णीयांनी भावनिक जिव्हाळा निर्माण करण्याची आता वेळ आली आहे ! धर्ममार्तंडांनी जुनाट कर्मठपणा सोडून विश्वधर्माचा स्वीकार केल्याशिवाय धार्मिक दंगली टळणार नाहीत. तोच प्रकार भाषा, प्रादेशिक संकुचितता वा जातीय कल्पनांना लागू करावा लागेल. डावी वा उजवी, कोणतीही राजकीय प्रणाली असो, जनतेच्या अंतिम सुखासाठी ती राबविण्यात येणार असेल तरच उज्ज्वल भविष्यकाळाची आशा आहे. □


कालच्या
बायसिकल थीव्हज्‌पासून
आजच्या
चोमाना डुडीपर्यंतच्या
पंधरा
देशी-विदेशी
चित्रपटांची ओळख

टच

अशोक
प्रभाकर
डांगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : १० रुपये

पुस्तके

# पाटणकरांच्या सौन्दर्यमीमांसेवरील सकस भाष्यग्रंथ

प्रदीप प्रभाकर गोखले

साहित्य, साहित्यसमीक्षा आणि सौंदर्यशास्त्र या क्षेत्रांत प्रभाकर पाध्ये हे काही एका उंचीने वावरत असतात. मराठीतील सर्वसाधारण साहित्यिक, साहित्यसमीक्षक आणि सौन्दर्यचिन्तक मंडळी प्रभाकर पाध्ये या व्यक्तिमत्त्वाला जरा बिचकूनच असतात. कारण त्यांच्या वरीलपैकी प्रत्येक विषयावरील विवेचनामागे एक विद्वत्तेचा अधिकार आणि एक बुद्धीची धार असते. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रावरील त्यांच्या लेखनाच्या निमित्ताने त्यांच्या सौन्दर्यशास्त्रावरील अधिकाराचा प्रत्यय मराठीतील जाणकार वाचकांना आला आणि 'पाटणकरांची सौंदर्यमीमांसा' या पुस्तकाच्या निमित्ताने त्याचा पुनःप्रत्यय येत आहे. पाटणकरांनी सौन्दर्यमीमांसा लिहिताना जो प्रचंड व्यासंग केला त्याच्या तोडीस तोड व्यासंग या विषयावर असणारे विद्वान महाराष्ट्रात हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच असावेत. प्रभाकर पाध्ये हे असे व्यासंगी आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्याजवळ स्वयंभू विचाराचे तेज आहे. त्यामुळे ज्यांनी पाटणकर वाचले आहेत त्यांनी पाध्ये वाचल्याशिवाय पाटणकरांविषयी आपले मत बनवू नये असा जणू एक संकेत समीक्षकांच्या मनात तयार होऊ लागला असावा.

या पुस्तकात पाध्यांचे एकूण दोन मोठे आणि दोन छोटे असे चार निबंध आहेत. त्यातील पहिल्या निबंधाचे तीन भाग आहेत. पहिल्या निबंधाच्या पहिल्या भागात पाध्ये पाटणकरांच्या लेखनातील विविध पैलूंचा गुणग्राहकपणे परामर्श घेतात. पाटणकरांच्या भाषाशैलीतील सोपेपणा, चपखल उदाहरणे देण्याची हातोटी, विद्वत्तेचा व्याप आणि आकलनाचा आवांका अशा विविध गुणांचे पाध्यांनी जे सोदाहरण वर्णन केले आहे त्यामुळे पाटणकरांच्या एकूण विचारांचे सूत्र, त्यांची विवेचनपद्धती, त्यांच्या लेखनाची विषयव्याप्ती यांची नीटस कल्पना नवख्या (पाटणकरांचे पुस्तक न वाचलेल्या) वाचकालाही येऊ शकेल. या पहिल्या भागानंतर मात्र पाध्यांचा एकूण भर हा प्रतिकूल टीकेवरच आहे. दुसरा भाग पाटणकरांच्या लेखनात मूळ ग्रंथांशी असलेल्या विसंगती, त्यांच्या विवेचनात कधीकधी कमी पडलेला कस यांचे दर्शन घडविण्यात पाध्ये खर्च करतात तर तिसऱ्या भागात पाटणकरांच्या विवेचनातील मध्यवर्ती भूमिका ही पाध्यांनी टीकेचे लक्ष्य बनविली आहे. दुसऱ्या निबंधात पाध्ये यांची भूमिका स्वतःच्या सौन्दर्यविषयक भूमिकेचे समर्थन आणि त्या संदर्भात पाटणकरांच्या भूमिकेचे खंडन अशी आहे. तिसरे प्रकरण मुख्यतः दि. य. देशपांडे यांच्या पाटणकर–टीकेचा परामर्श घेणारे असून चवथे प्रकरण समारोपाचे आहे.

पाटणकर असे मानतात की, सौंदर्यशास्त्र हे विज्ञानाच्या पातळीला जाऊ शकत नाही. ते असेही मानतात की सौन्दर्यानुभव हा लौकिकच असतो. पाटणकरांचे असेही मत आहे की, कलाकृतींमधील साम्य हे केवळ कुलसाम्य असते. सर्व कलाकृतींमध्ये वावरणारा कलाकृतीचा व्यवच्छेदक धर्म त्यामुळेच सांगता येत नाही. पाध्ये यांना असे वाटते की, सर्व कलात्मक अनुभवांमध्ये आढळणारे काही समान सूत्र पकडता येईल आणि मर्यादित अर्थाने सौन्दर्यशास्त्र हे विज्ञानाची बरोबरी करू शकेल. कलात्मक अनुभव हा व्यवहारातीत, स्वरसरंजनात्मक अशा प्रकृतीचा असल्याचे श्री. पाध्ये मानतात व या अर्थाने ते अलौकिकतावादी आहेत. कला या कल्पनेच्या स्वाभाविक वादग्रस्ततेवर मात करील अशी संकल्पना शोधण्याचा पाध्ये यांचा प्रयत्न आहे. त्यांना असे वाटते की, कलाकृतींचा विचार कलात्मक अनुभवाच्या अंगाने केला तर कुलसाम्यामुळे व स्वाभाविक वादग्रस्ततेमुळे उत्पन्न होणारी समस्या दूर होऊ शकेल.

अर्थात पाटणकरांच्या भूमिकेशी विरोधी काटकोनात आपली भूमिका उभी आहे असे जे पाध्ये यांनी म्हटले आहे (पृ. ९१) ते सर्वांशाने खरे नाही. तसा आभास मात्र पुस्तक वाचताना निर्माण होतो. विटगेन्स्टाइनच्या कुलसाम्य (Family resemblance) या कल्पनेचा पाटणकरांवर जबरदस्त पगडा असल्याचे जाणवून पाध्ये बरेच अस्वस्थ झालेले दिसतात; पण कुलसाम्याच्या या विटगेन्स्टाइनच्या सिद्धान्ताला स्पष्टपणे विरोध कुठेच केलेला नाही. उलट मानवी व्यवहारात विविध खुल्या संकल्पना (open concepts) वापरल्या जातात हे मान्य करून त्यांचे पद्धतशीर स्पष्टीकरण देण्याचाच प्रयत्न पाध्ये करतात. अनुभवांच्या देवघेवीसाठी आपण निर्माण केलेले हे संकल्पनांचे संकेत काटेकोरपणे वापरता येत नाहीत. ते जिथे अपुरे पडतात तिथे संकल्पनांमधे वास्तवाचा कोंडमारा होतो. वास्तव संकल्पना व्यवस्थेविरुद्ध बंड करते आणि या संकल्पना वादग्रस्त बनतात; खुल्या बनतात. अशा प्रकारचे जे खुल्या (open) आणि स्वभावतः वादग्रस्त (essentially contested) संकल्पनांचे जे स्पष्टीकरण पाध्ये यांनी दिले आहे ते वस्तुतः विटगेन्स्टाइन,

गॅली व पाटणकर यांना विरोधी नसून उपोद्‌बलकच आहे. संकल्पनांमधील कुलसाम्य आणि त्यांची स्वाभाविक वादग्रस्तता हे अनुक्रमे विटगेन्स्टाइन आणि गॅली यांनी मांडलेले सिद्धान्त चूक आहेत असे पाध्ये यांनी कुठेच दाखविलेले नाही. पाध्ये म्हणतात त्याप्रमाणे कदाचित हे सिद्धान्त मांडीत असताना मूळ अडचणीकडे दुर्लक्ष झाले असेल; पण तेवढ्यामुळे हे सिद्धान्त चूक ठरत नाहीत. त्यामुळे पाध्ये यांचे विटगेन्स्टाइनविरोधी अवसान उसने वाटते.

पाटणकरांवर टीका करण्याच्या निमित्ताने श्री. पाध्ये यांना स्वतःची सौंदर्यमीमांसा पुढे मांडायची आहे. त्यांनी जागोजाग अशी पर्यायी मीमांसा मांडल्यामुळे अर्थातच त्यांच्या टीकेचे सामर्थ्य वाढले आहे आणि या पर्यायी मीमांसेचा विचारही येथे क्रम प्राप्त आहे. कला ही एक खुली संकल्पना मानली; (अर्थात पाध्ये समारोपात म्हणतात की, कला ही बंदिस्त कल्पनाच आहे. एका अर्थाने पाध्यांचे म्हणणे खरे आहे. कारण कुठलीही तथाकथित खुली कल्पना पूर्णपणे खुली नसतेच; पण तरीही ती काही प्रमाणात खुली असू शकते. येथे पाध्यांनी आपला आशय स्पष्ट केलेला दिसत नाही.) तरी सुद्धा कलात्मक अनुभव ही खुली संकल्पना नाही आणि त्यामुळ कलात्मक अनुभवाच्या अंगाने कलेचा विचार केला, तर कलाविषयक विचाराला एक निश्चितता आणता येईल आणि सौंदर्यमीमांसेला एक शास्त्रीय दर्जा येऊ शकेल असे पाध्ये यांच्या प्रतिपादनाचे सूत्र दिसते. पाध्ये यांनी मांडलेले महत्त्वाचे मत असे आहे की, अनुभवासाठी अनुभव घेण्याची वृत्ती ही कलात्मक अनुभवाची आवश्यक पूर्व-अट असते. पाध्ये यांनी आवश्यक अट (necessary condition) आणि पुरेशी अट (Sufficient Condition) यांच्यातील फरक जरी पुस्तकात स्पष्टपणे मांडला नसला तरी त्यांना तो अभिप्रेत असावा आणि वर वर्णिलेली वृत्ती किंवा धारणा ही त्यांना आवश्यक अट म्हणूनच अभिप्रेत असावी, पुरेशी अट नव्हे. अन्य व्यावहारिक लाभाच्या प्रेरणेने घेतला जाणारा अनुभव आणि तात्त्विक विश्लेषणासाठी घेतला जाणारा अनुभव या दोन्हींपेक्षा कलात्मक अनुभव कसा वेगळा असतो हे त्यांनी सांगितलेली स्वरसरंजनात्मक वृत्तीची अट समजावून घेतली, तर लक्षात येऊ शकते.

अर्थात त्यांच्या प्रतिपादनातून काही प्रश्नही निर्माण होतात. एक तर असे दिसून येते की, ज्याला रूढ अर्थाने कलात्मक अनुभव असे म्हणता येत नाही असे अन्यही काही अनुभव हे त्या अनुभवासाठीच घेतले जातात. उदाहरणार्थ एखादा धाडसी गिर्यारोहक व्यावहारिक फायद्याची अपेक्षा न ठेवता किंवा एखादे गिर्यारोहणशास्त्र बनविण्याचा उद्देश मनात न बाळगता वेगवेगळ्या साहससहली काढतो, त्याच्या त्या कृत्यामागे अनुभवासाठी अनुभव घेण्याची धारणात्मक अट नसते काय? अर्थात असे म्हणता येईल की, तो गिर्यारोहक 'अनुभवासाठी अनुभव' या नावाखाली वाट्टेल ते अनुभव घेण्यास सरसावत नाही, तर तो त्यांमध्ये निवड करतो. म्हणजेच कोणत्या प्रकारचा अनुभव आपल्याला आता घ्यायचा आहे याविषयी काही ढोबळ निर्णय घेऊन तो पुढे सरसावतो; पण ही गोष्ट रसिकाच्या बाबतीतही खरी आहे. रसिकसुद्धा काही ढोबळ निवड करून मग कलात्मक अनुभवाला सामोरा जातो. तेवढ्यामुळे अनुभवासाठी अनुभव घेण्याच्या त्याच्या वृत्तीला बाध येत नाही. फार तर आपल्याला त्या वृत्तीचे वर्णन नुसतेच अनुभवासाठी अनुभव असे करण्यासाठी विशिष्ट अनुभवासाठी अनुभव असे करावे लागेल. अनुभवाचे ते विशिष्ट स्वरूप त्या अनुभवाचाच एक भाग असेल, ते विशिष्ट स्वरूप अनुभवाबाहेरचे, अनुभवानंतर साध्य होणारे असणार नाही.

अर्थात, असे दिसते की, पाध्ये यांनी *'अनुभवासाठी अनुभव' अशी व्यापक परिभाषा* वापरून काहीशी संदिग्धता निर्माण केली आहे. त्याचबरोबर त्या वृत्तीचे वर्णन करताना त्यांनी 'अनुभवाचा आस्वादासाठी आस्वाद' 'स्वरसरंजनात्मक वृत्ती' इत्यादी अनेक शब्दप्रयोग केले आहेत त्यामुळे काही बाबतीत गोंधळ कमी होतो व काही बाबतीत गोंधळात भर पडते. आस्वादाची परिभाषा त्यांनी वापरल्यामुळे त्यांना नुसत्या अनुभवासाठी घेतल्या जाणाऱ्या अनुभवापेक्षा (उदा• वर वर्णिलेला गिर्यारोहकाचा अनुभव) वेगळे काही सांगायचे आहे हे कळते; पण त्याचबरोबर 'अनुभवाचा आस्वाद' हा काय प्रकार आहे? असा प्रश्न पडतो. कारण आस्वाद हा एक प्रकारचा अनुभवच असल्याने 'अनुभवाचा आस्वाद' याचा 'अनुभवाचा एक प्रकारचा अनुभव' अशा प्रकारचा अर्थ निष्पन्न होतो. अनुभवानंतर त्याच अनुभवाचा स्मरणासारखा (किंवा अनुव्यवसायासारखा) अनुभव येऊ शकतो हे खरे; पण 'अनुभवाचा आस्वाद' यातून पाध्ये यांना तसे काही म्हणायचे नसावे; पण 'अनुभवाचा आस्वादासाठी आस्वाद' अशी भाषा त्यांनी पुन्हापुन्हा वापरल्यामुळे गोंधळ वाढतो.

जरी अशा रीतीने 'अनुभवासाठी अनुभव' आणि आस्वादासाठी आस्वाद' यांत आपण फरक केला आणि आस्वादासाठी आस्वाद ही धारणा कलात्मक अनुभवाची पूर्व–अट मानली तरी प्रश्न टळत नाही. वस्तुतः 'आस्वादासाठी आस्वाद' ही केवळ कलात्मक अनुभवाची पूर्व–अट नसून कुठल्याही रमणीय विषयाच्या सौंदर्यानुभवाची पूर्व–अट म्हणावी लागते. हिमालयाच्या डोंगररांगांचा एखाद्या रसिक प्रेक्षकाला येणारा दृश्यानुभव हा 'कलात्मक' अनुभव म्हणता येत नाही; पण तो सौंदर्यानुभव म्हणता येतो. कलाकृतीचा रमणीय कलाकृती म्हणून येणारा सौंदर्यानुभव आणि न–कलाकृतीचा रमणीय विषय म्हणून येणारा सौंदर्यानुभव यात फरक केला पाहिजे. तथापि आस्वादासाठी आस्वाद ही पूर्व-अट दोन्हींना सारखीच लागू पडते. हे जर खरे असेल, तर कलात्मक अनुभवाचे वेगळेपण केवळ *'आस्वादासाठी आस्वाद घेण्याची वृत्ती'* ही पूर्व-अट सांगून कळणार नाही. कारण ही पूर्व – अट कलाकृतीचा कलात्मक अनुभव आणि अन्य सौंदर्यानुभव या दोन्हींना लागू पडेल. त्यासाठी कलात्मक अनुभवाची केवळ आवश्यक अट सांगून भागणार नाही, तर

**पाध्ये यांनी पर्यायी मीमांसा मांडल्यामुळे त्यांच्या टीकेचे सामर्थ्य वाढले आहे.**

पुरेशी अट (sufficient condition) सांगावी लागेल. अर्थात तसे करूनही कलासंकल्पनेच्या वादग्रस्ततेवर मात (कुठल्या अर्थाने ?) होईल का हा प्रश्न राहतोच.

माझा असा समज आहे की, पाध्ये यांनी सौंदर्यानुभवाचे जे अलौकिक (त्यांच्या शब्दात–व्यवहारातीत) स्वरूप मानले आहे त्यामुळे त्यांच्या विचारांना नकळत गूढवादाचे वलय प्राप्त होते. अनुभवासाठी अनुभव या वृत्तीने घेतला जाऊन सुद्धा कलात्मक अनुभव हा लौकिकच असतो. केवळ इतर लौकिक अनुभवांपेक्षा हा लौकिक अनुभव वेगळा असतो, म्हणून तो अलौकिक ठरत नाही. तसेच हा कलात्मक अनुभव ज्या अर्थी 'घेतला जातो', तो कुणाला तरी 'येतो' (घेणे, येणे यांचा वाच्यार्थ येथे घ्यायचा नाही, लक्ष्यार्थ घ्यायचा.) आणि त्या कलात्मक अनुभवाविषयी भाषिक व्यवहार करता येतो, त्या अर्थी तो व्यवहारातीतही नसतो. ज्याप्रमाणे 'मी मेलो आहे' असा, भ्रामक का होईना, अनुभव ज्याला येतो, तो जिवंतच असतो, त्याप्रमाणे मी व्यवहारपलीकडे गेलो आहे असा, भ्रामक का होईना, विशिष्ट अनुभव ज्याला येतो, तो व त्याचा तो अनुभव व्यवहारान्तर्गतच असतात, व्यवहारातीत नसतात.

'सौंदर्यशास्त्र हे विज्ञान नाही' या पाटणकरांच्या भूमिकेचे खंडनसुद्धा पाध्ये यांनी अधिक समर्थपणे करायला हवे होते असे वाटून गेले. विशेषतः वैज्ञानिक आणि कलावंत यांच्यात तुलना करून सौंदर्यशास्त्र हे विज्ञानापेक्षा कसे वेगळे ठरते ते दाखविण्याचा त्यांचा खटाटोप (पृ. ५८ ते ६०) अप्रस्तुत होता. वैज्ञानिक आणि सौंदर्यशास्त्रज्ञ यांच्यातच तुलना व्हायला हवी होती आणि त्या तुलनेच्या साहाय्याने त्यांनी असे दाखवायला हवे होते की, सौंदर्यशास्त्र हे जरी पदार्थविज्ञानशास्त्रासारखे एखादे प्राकृतिक विज्ञान मानता आले नाही तरी एखादा समाजशास्त्रज्ञ ज्या पद्धतीने सामाजिक व्यवहाराची उपपत्ती लावतो, जवळजवळ त्याच पद्धतीने सौंदर्यशास्त्रज्ञाने सौंदर्यव्यवहाराची व कलात्मक व्यवहाराची उपपत्ती लावावी अशी निदान अपेक्षा असते. तशी ती लावली जात नाही हा त्या त्या तथाकथित सौंदर्यशास्त्रज्ञांचा दोष आहे; पण त्यामुळे सौंदर्यशास्त्र हे अविज्ञान ठरत नाही; अशी ठाम भूमिका पाध्ये यांनी घेतली तर पाटणकरांना एक प्रबळ प्रतिपक्ष मिळेल.

सौंदर्यशास्त्राची सुरुवात कुठून व्हावी ? आणि त्याचा पुढील प्रवास कसा व्हावा ? हे प्रश्न या संदर्भात उपस्थित होतात. सामान्य रूपाने ही सुरुवात अशी सांगता येईल की, काही वस्तूंविषयी आपण 'सुंदर' व दुसऱ्या काही वस्तूंविषयी 'कुरूप' अशा अर्थाचा अभिप्राय व्यक्त करतो. तसेच काही वस्तू व घटना समाजात कलाकृती म्हणून मान्यता पावत असतात. येथून सुरुवात केल्यावर सर्वप्रथम सुंदर कलाकृती या कल्पना कुठून येतात, ज्या कृतींना कलाकृती म्हणून मान्यता मिळते ती त्यांना कशामुळे मिळते असे प्रश्न सौंदर्यशास्त्रज्ञ विचारू शकतो. हे करीत असताना सौंदर्यशास्त्रज्ञाची स्वतःची अशी कलाकृतीविषयीची मूल्यात्मक कल्पना असली पाहिजे असे नाही. त्याने तथाकथित कलाकृतींनाच समोर ठेवून विचाराला सुरुवात करायला हवी. सौंदर्यशास्त्रज्ञ जेव्हा सौंदर्यव्यवहाराचा अभ्यास करतो, तेव्हा त्याने आपल्या मनात सौंदर्याचे स्वतःचे काही निकष गृहीत धरले पाहिजेत असे नाही. किंबहुना मूल्यविषयक शास्त्र रचणाऱ्या शास्त्रज्ञाची मूल्यविषयक भूमिकाही मूल्यनिरपेक्ष (Value–neutral) असली पाहिजे तरच ते शास्त्र जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ होऊ शकते. उलट पाटणकरांनी असे गृहीत धरल्याचे जाणवते की, सौंदर्यशास्त्राचे स्वतःचे असे सौंदर्यविषयक व कलाविषयक निकष असतातच व ते असलेच पाहिजेत. या ठिकाणी कलावंत, रसिक आणि समीक्षक एका बाजूला आणि सौंदर्यशास्त्रज्ञ दुसऱ्या बाजूला अशी जी विभागणी व्हायला हवी ती पाटणकर करीत नाहीत. समीक्षकाने स्वतःची कलाविषयक मूल्ये बाळगून मूल्यवान अशा कलाकृतीचे मूल्यांकन करणे हे सम्मत असते; पण सौंदर्यशास्त्रज्ञाने तसे करणे हे त्याच्या शास्त्रज्ञाच्या भूमिकेशी सुसंगत ठरणार नाही. तेव्हा समीक्षक आणि सौंदर्यशास्त्रज्ञ यांच्यात जसा स्पष्ट फरक करायला हवा तसा पाटणकरांनी केलेला नाही. त्यामुळेच बहुधा पाध्ये यांना असे वाटत असावे की, पाटणकरांचे सौंदर्यशास्त्र म्हणजे समीक्षाशास्त्रच झाले आहे.

वरील भूमिका जर मान्य झाली तर आणखीही काही गोष्टी स्पष्ट होतील. मूल्यविशिष्ट अशा सौंदर्यव्यवहाराचा व कलात्मक व्यवहाराचा मूल्यनिरपेक्षपणे शास्त्रशुद्ध अभ्यास करणे व त्यातील सार्वत्रिक नियम (असल्यास) शोधणे, नसल्यास ते तसे का नाहीत, नियमांच्या सार्वत्रिकतेला कशामुळे बंधने पडतात हे सांगणे हे सौंदर्यशास्त्रज्ञाचे काम असते. साहजिकच त्यामुळे सौंदर्यशास्त्रज्ञाला संश्लेषक विधाने करण्यास खूप वाव असतो आणि सार्वत्रिक स्वरूपाची संश्लेषक विधाने शोधण्याचा त्याचा प्रयत्नही असतो. कलाविषयक व सौंदर्यविषयक व्यवहारांचा भाषाशास्त्रीय अभ्यास, कलाविषयक व सौंदर्यविषयक मूल्यकल्पना मनुष्यसमूहात कशा उत्पन्न होतात व विविध अंगांनी वाढतात त्याचा मानवशास्त्रीय व समाजशास्त्रीय अभ्यास, तथाकथित सौंदर्यानुभवामध्ये घडणाऱ्या व कलानिर्मितीमध्ये घडणाऱ्या मानसिक प्रक्रियांचा मानसशास्त्रीय अभ्यास असा सर्व वैज्ञानिक स्वरूपाचा अभ्यास सौंदर्यशास्त्रात येऊ शकतो. एक काळ असा होता की, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यात फरक केला जात नव्हता. जेव्हा विज्ञाने स्वतःची एक निश्चित अभ्यासपद्धती घेऊन विकसित होऊ लागली, तसतसे तत्त्वज्ञानाचे क्षेत्र मर्यादित होऊ लागले. तसे जर सौंदर्यशास्त्राच्याही बाबतीत होत असेल तर सौंदर्यचिंतकांनी त्यामुळे बिचकून जाण्याचे कारण दिसत नाही. अर्थात वैज्ञानिक सिद्धांताच्या नावाखाली कुठलाही सिद्धांत त्यांनी वैज्ञानिकांकडून स्वीकारावा असे नाही. सौंदर्यशास्त्र नावाचे एखादे विज्ञान किंवा विज्ञानाचा भाग किंवा विज्ञानाचे संकुल तयार झाले तरी त्याच्या गृहीतकृत्यांची; 'शास्त्रीय' पद्धतीची व त्या शास्त्रीय पद्ध-

तीच्या अंमलबजावणीची तात्त्विक छाननी करण्याचे काम तत्त्वज्ञानाकडे शिल्लक राहीलच. जोवर विज्ञान आहे, तोवर विज्ञानविषयक संशयवाद राहील व जोवर संशयवाद राहील तोवर तत्त्वज्ञानही राहील. अशासारखी भूमिका पाध्ये यांनी घेतली तर ते स्वतःच्या सौंदर्यविज्ञान मांडण्याच्या भूमिकेचे समर्थन करू शकतील आणि तरीही तत्त्वज्ञानाला वाव देऊ शकतील.

खुद्द पाटणकरांनी आपल्या सौंदर्यमीमांसेत अशी कित्येक संश्लेषक विधाने केली आहेत आणि ती पाटणकर म्हणतात तशी, केवळ निकष सांगणारीही नाहीत. उदाहरणार्थ सुंदर या पदाचे कार्य सुरुवातीला उद्गारवाचक चिन्हासारखे होते हा विटगेन्स्टाइनचा म्हणून त्यांनी उद्धृत केलेला विचार पहा किंवा सौंदर्य, कला या कल्पना द्विध्रुवात्मक आहेत हा पाटणकरांनी मांडलेला विचार पहा. पाटणकरांचा द्विध्रुवात्मकतेचा सिद्धांत विश्लेषक नाही तर सुंदर आणि कला या कल्पनांचा ऐतिहासिक आढावा घेऊन पाटणकरांनी व्यक्त केलेला तो संश्लेषणात्मक विचार आहे. सौन्दर्यशास्त्रज्ञ ज्या वेळी सौन्दर्य इत्यादी कल्पना कशा वापरल्या जातात ते सांगतो त्या वेळी तो संकल्पनाविषयी संश्लेषणात्मक विधाने करीत असतो. खुद्द त्या कल्पना वापरणारा माणूस त्या कल्पनांचा व्यामिश्र अर्थ गृहीत धरीत असेल तर त्या व्यामिश्र अर्थाची फोड करण्याचे– विश्लेषण करण्याचे – कामही सौंदर्यशास्त्रज्ञ करू शकतो; पण कुठलाही तत्त्वज्ञ संकल्पनाविषयी बोलताना नेहमीच विश्लेषक विधाने करतो असे म्हणता येत नाही. कांट असो, विटगेन्स्टाइन असो वा मूर असो, कुणीही तसे केलेले नाही. हे सर्व तत्त्वज्ञ ज्या अर्थी संकल्पनांविषयी काही सामान्य स्वरूपाची संश्लेषक विधाने करीत असतात त्या अर्थी ते कळत न कळत विज्ञानाच्या प्रांतात (योग्य किंवा अयोग्य रीतीने) प्रवेश करीत असतात असे पाध्यांच्या बाजूने म्हणता येईल.

पण प्रत्यक्षात मात्र सौंदर्यशास्त्राला विज्ञानाच्या क्षेत्रात मुक्तद्वार तर देता येत नाही, पण सौन्दर्यविषयक वैज्ञानिक सिद्धांतांचे महत्त्वही नाकारता येत नाही अशा द्विधा अवस्थेत पाध्ये सापडले आहेत असे जाणवते. अर्थात पाटणकरांची आपली भूमिका विरोधी काटकोनात उभी आहे असे जरी पाध्ये यांनी म्हटलेले असले तरी आपला प्रतिपक्ष पुरेशा ठामपणे उभा करण्यात पाध्ये यशस्वी झाले आहेत असे दिसत नाही. प्रत्येक वेळी कांट, गॅली, विटगेन्स्टाइन इत्यादी नामवंत पाश्चात्यांना वेठीस धरल्यामुळे त्यांच्या विवेचनाला संदर्भजटिलता आली आहे आणि त्यामुळे वाचकांच्या मेंदूला भरपूर खाद्य मिळू शकते हे खरे; पण त्यामुळे तात्त्विक दृष्टिकोनातून पाध्ये यांनी मांडलेला स्वतंत्र टीकात्मक विवेचनाचा भाग त्यात कुठे तरी हरवून गेला आहे असे वाटते. नामवंत विचारवंतांची मदत घेता घेता आपल्या विचारांना पुष्टता येण्याऐवजी सूज तर येत नाही ना अशीही शंका पुस्तक वाचीत असताना मनाला स्पर्श करते. ¤

पाटणकरांची सौंदर्यमीमांसा
लेखक : प्रभाकर पाध्ये
नूतन प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : १५ रु.

# आमचे ग्रंथालय

## Secret Of The Ages–

( UFOs from inside the earth ) –
by Brinsley Le Poer Trench
( Panther Books ),
Pages 206, 60 pence.

हे पुस्तक Cosmology वर आहे. कॉस्मॉलॉजी म्हणजे विश्वाची (Cosmos) उत्पत्ती व इतिहास. विश्वाची सुरुवात एका मोठ्या धडाक्याने (Big Bang Theory) झाली किंवा हे विश्व आहे असेच अनादी काळी होते व भविष्यातही असेच राहील (Steady-state theory) असे मानणारे काही शास्त्रज्ञ आहेत. अर्थात् इतरही बरेच सिद्धांत आहेत. The Collapsing Universe, The Expanding Universe यासारखे नाना तर्क शास्त्रज्ञ बांधीत आहेत. जेव्हा एखादा तारा मृत्यू पावतो, तेव्हा तो अगदी लहान लहान होत जातो. तो त्याच्या स्वतःच्या आतच Collapse होत जातो व या वेळी गुरुत्वाकर्षणाचा जोर इतका असतो की, त्या भग्न ताऱ्यातून निघणारे भयानक ओजसही (light) त्यातून सटकू शकत नाहीत. शेवटी तर हा तारा इतका लहान होतो की तो एका चमच्यातही राहू शकतो! त्याचे वजन मात्र प्रचंड असते! असल्या एका ताऱ्याचे वजन सहस्र टनांइतके असते! खरंच या भीषण, सुंदर, धूसर, गूढ व अगम्य विश्वात काय काय होत असते याचा थांगपत्ता विज्ञानाने कधीच लागणार नाही. शेवटी माणूस आपले मन शारीरिक पिंजऱ्यातून मोकळे करून या अगम्य विश्वात शिरला तरच थोडाफार थांगपत्ता लागेल. किंवा विज्ञान व अध्यात्म शेवटी एकमेकाला येऊन भिडतील व काही काही उत्तरे सापडायला लागतील. आपण ज्याला पल्सार्स म्हणतो त्यात असलेच लहानमोठे न्यूट्रॉन तारे असतात.

आणखी एक एक्झॉबायॉलॉजी नावाचे शास्त्र आहे. नावाप्रमाणेच याचा अर्थ 'बायॉलॉजी आउटसाईड' म्हणजे विश्वातील पृथ्वीखेरीज इतर जीवन. ही दोन (Exobiology व Cosmology) कधीकधी एकमेकांजवळ येतात व एकमेकांत घुसतातही. एक्झॉबायॉलॉजीमध्ये तर काही लेखकांच्या कल्पनाशक्तीला उधाण येते व परग्रहावरचे जीवन कसे असते याचे तंतोतंत वर्णन ते करतात. (उदा. परग्रहावरचे जीव 'ऑक्सिजन' ऐवजी 'मेथेन' गॅस वर जगत असतील!) मेथेन गॅस हा सडक्या वनस्पतीपासून निघत असतो. तो कधीकधी कोळशाच्या खाणीत सापडतो. याला marsh gas ही म्हणतात. त्याचे मिश्रण हवेबरोबर झाल्यास स्फोट होतो.

श्री. ट्रेंच हे Ufologist आहेत. म्हणजे Unidentified Flying Objects च्या बाबतीत अगदी निष्णात आहेत. उत्तर ध्रुवासारखी वस्तूच नाही असे ट्रेंच म्हणतात. म्हणजे तसा बिंदूच्या ऐवजी तिकडे एक कोमट पाण्याचा समुद्र आहे आणि तिथेच पृथ्वीच्या पोटात शिरण्याचा रस्ता आहे व त्यातून UFo's व इतर प्राणी बाहेर येऊन वावरत आहेत. या पुस्तकात सॅटॅलाइटमधून उत्तर व दक्षिण ध्रुवाचे घेतलेले फोटो आहेत. त्या फोटोंत उत्तर ध्रुवाच्या ठिकाणी एक भले मोठे गोल भोक दिसते. इतर फोटोंतही हे भोक कमी-अधिक मोठे दिसते. पृथ्वी आतून पोकळ

आहे व तीत कैक चमत्कार भरले आहेत असे श्री. ट्रेंचना वाटते.

जपानवर अणुबॉंब फेकल्यानंतर UFos जास्त दिसायला लागले. कारण पृथ्वीच्या आतील लोकांना धोका वाटला.

पूर्वीच्या काळात जसा ज्युले वर्न नं. १ चा 'सायन्स फिक्शन' लेखक होता तसा अलीकडे एक प्रोफेसर जे. आर. टॉलकाइन नावाचा विविध विषयांवर लिहिणारा प्रख्यात लेखक होता असे या पुस्तकात दिले आहे. ज्युले वर्नचे 'A Journey to the Centre of the Earth' हे पुस्तक श्री. ट्रेंच यांच्या पुस्तकाच्या अनुषंगाने जरूर वाचावे. टॉलकाइन हा इंग्रजी भाषेचा प्राध्यापक होता. तो Philologist ही होता. म्हणजे भाषाशास्त्रज्ञ (भाषेचा इतिहास, भाषेची एकमेकांशी तुलना करणे वगैरे.) होता. विल्यम ब्लेक या कोरीव काम करणाऱ्या कवीसारखेच टॉलकाइनने आपले स्वतःचेच पौराणिक साहित्य निर्माण केले आहे. टॉलकाइनचे 'लॉर्ड ऑफ द रिंग्ज' हे पुस्तक सुद्धा 'Middle Earth' वर आहे.

श्री. ट्रेंचच्या 'सीक्रेट ऑफ द एजेस' या पुस्तकात 'लाइफ' मासिकातील एक आठ पानी सदराची माहिती दिली आहे. 'लाइफ'चा २१ मे १९५१ चा अंक होता तो. हे सदर श्री. शॅवर याने लिहिले होते. त्यामध्ये अशी माहिती दिली होती की, पृथ्वीच्या मध्यभागी डॅरॉ आणि टॅरॉ या दोन जमाती रहातात. डॅरॉ दुष्ट व masochist (दुसऱ्यांना दुःख देण्यात आनंद मानणारे) असतात. टॅरॉ हे फार सुधारलेले व निःस्वार्थी असतात. विमानाचे अपघात वगैरे डॅरॉ लोक करतात.

'लाइफ'सारख्या मासिकात हे सदर वाचल्याने आश्चर्य वाटले. लागोपाठ 'सीक्रेट ऑफ द एजेस' सारखी पुस्तके वाचली तर कंटाळा येईल; पण इतर वाचन करून मधेच असली पुस्तके वाचली की मजा वाटते.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

---


# जनांचा प्रवाहो चालिला

लेखक : विनय हर्डीकर

आणीबाणीचं आसुरी आव्हान ओळखणारं,
त्या आव्हानानं अस्वस्थ होऊन पेटून उठणारं आणि
विकासशील वैचारिक निष्ठेनं या जुलमाला
प्रकटपणे हटकणारं.......विनयचं
संवेदनाक्षम, चिकित्सक, रसरशीत मन....

या मनाची
अन् या मनात पडलेल्या असंख्य, अथांग प्रतिबिंबांची
ही मार्मिक आणि मर्मभेदक कहाणी....

या लेखनाला कादंबरी म्हणावं की आत्मकथन ?
की आपलं कहाणीच ?
म्हणावं काहीही, एक खरं...
प्रांजळ मनानं वाचणाऱ्याला ही कहाणी मनोमन बोलकं करील,
अंतर्मुख करील, प्रत्येकापुढे निर्लेप आरसा धरील—
जबाबदारीनं, सहानुभूतीनं....आणि
आपुलकीच्या कडव्या उत्कटतेनं.

दुर्मिळ असे अस्सल बावनकशी क्षण विनय जगला.
ते वाया गेले नाहीत.
या कहाणीत त्या क्षणांना तितकंच अस्सल,
तितकंच बावनकशी रूप लाभलं आहे.

—प्रा. स. शि. भावे

**प्रसिद्ध झाले**

मूल्य : वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे ३०

अवती-भवती : पृष्ठ ४ वरून

म्हणावी लागेल. अर्थात या नव्या प्रयत्नांना आम्ही केवळ प्रारंभ केला आहे. खरी वाटचाल पुढेच आहे. ◻

## ◻ विधवा आणि पुनर्विवाह

समाजसुधारक सांगतात विधवांनी लग्न केले पाहिजे. पतीच्या पश्चात सारे आयुष्य उदास आणि भकासवाणे करण्याचे काहीही कारण नाही. जोपर्यंत बालविवाह होते तोपर्यंत या म्हणण्याला पुरेसा अर्थही होता. कारण पती मरून गेल्यास या बालविधवेचे आयुष्य खरोखरच पूर्ण भकास होऊन जात असे. आता बालविवाहाचे प्रमाण पुष्कळच कमी झाले आहे. स्वतःच्या कुटुंबाची जबाबदारी पेलण्याइतकी ताकद असल्याखेरीज आमचे तरुण लग्नालाच उभे रहात नाहीत. स्वाभाविकपणे लग्नाच्या वेळी त्यांचे वय चांगले तीस-बत्तीसच्या घरात असते. आता अशा नवऱ्याबरोबर पाच सात वर्षे संसार केल्यावर जर पती वारला तर विधवेने पुनर्विवाह करावा की नाही? समाजसुधारक सांगणार जरूर करावा; पण याबाबत प्रत्यक्ष विधवेची आणि तिच्या कुटुंबियांची काय भावना असते? दिल्लीच्या एका संस्थेने याबाबत संशोधन करून पाचशे विधवांच्या मुलाखती घेतल्या. या पाचशेपैकी ३५० शहरी भागात रहाणाऱ्या तर १५० ग्रामीण भागात रहाणाऱ्या होत्या. त्यांना विचारलेल्या प्रश्नांमध्ये, विधवांनी पुनर्विवाह करावा की नाही हा असा एक प्रश्न होता, त्याचप्रमाणे व्यक्तिशः तुम्ही पुनर्विवाह कराल की नाही असाही एक प्रश्न होता. विधवांनी पुनर्विवाह करावा... असे जवळजवळ २५ टक्के बायकांनी जरी ठासून सांगितले तरी दुसऱ्या प्रश्नाला होकार देणारांची संख्या केवळ २·२ टक्के होती. म्हणजे इतर विधवांनी विवाह करावा असे सांगणारी विधवा स्वतः मात्र विवाह करण्यास फारशी उत्सुक दिसत नाही, असे या चौकशीत निष्पन्न झाले. लग्न न करणेच आपण पसंत करू असे सांगणाऱ्या विधवांपैकी जवळजवळ ९५ टक्के विधवांना आपले आता लग्नाचे अथवा नव्याने संसार करण्याचे वय राहिले नाही असे वाटते. मुलांच्या जबाबदाऱ्या, धार्मिक दडपणे यासारखी कारणेही त्या पुढे करताना दिसतात. तथापि विशेष महत्त्वाचे कारण म्हणजे आपण लग्न केल्यास आपल्या मुलांची उपेक्षा होईल असे सापत्य विधवांना वाटते आणि मुलांच्या बाबतीत धोका पत्करून लग्न करण्यास त्या राजी नसतात. मुलाखती घेतलेल्यांपैकी दहाजणींमागे एकीने असेही सांगितले की पहिल्या पतीबरोबरच्या भावनात्मक आठवणी आणि त्याचा सहवास यांचा विसर पडत नसल्याने लग्न नको वाटते. जवळजवळ तेवढ्याच मुलींची पहिले लग्न तेच खरे लग्न अशीही भावना आहे. ज्या विधवा पुनर्विवाहाचे समर्थन करतात त्या प्रामुख्याने लग्नापासून मिळणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेकडे बोट दाखवितात. आपल्या विस्कळित जीवनाला अर्थ प्राप्त होईल असेही त्यांपैकी काहींना वाटते, तर मुलांना वडील मिळाल्यास त्यांचा मानसिक ताण कमी होईल असे काही विधवांनी बोलून दाखविले.

विधवांचे लग्नाबाबतचे विचार आणि त्यांची सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती यांचे अवलोकन करण्यासाठी दिल्ली स्कूल ऑफ सोशल वर्क या संस्थेतर्फे माहिती जमविण्यात आली. धार्मिक विचारांचा आणि पुनर्विवाहाचा कितपत संबंध असतो? मुसलमान आणि ख्रिश्चन धर्मामध्ये पुनर्विवाहाबाबत कोणतेही बंधन नाही. ज्यांच्या मुलाखती घेऊन हे निष्कर्ष काढण्यात आले त्यांमध्ये १४ टक्के मुसलमान विधवा होत्या, तर ख्रिश्चन विधवांचे प्रमाण ७ टक्के होते. जातवार पहाणीमध्ये असा एक विचित्र अनुभव आला की, धर्माचा विरोध नसूनही अधिक मुसलमान विधवांनी पुनर्विवाहाला विरोध केला. आपण पुनर्विवाह केला. तर आपल्या मृत नवऱ्याच्या आत्म्याला अतीव दुःख होईल असेही कारण देऊन आपण पुनर्विवाह करणार नसल्याचे दोघींनी सांगितले. पहिल्या पतिसंबंधींच्या भावना काही विधवांनी अगदी मनमोकळेपणाने बोलून दाखविल्या. एकीने सांगितले–माझ्या पतीच्या जागी मी दुसऱ्या कुणाचा कधीच स्वीकार करू शकणार नाही! तर दुसरीने सांगितले की–सुखाचा सारा ठेवा मला पहिल्या पतीकडून मिळाला आहे. मला जे मिळाले त्यापेक्षा दुसऱ्या लग्नामुळे आणखी काही मिळू शकेल असे मला वाटत नाही. तर आपल्या पहिल्या पतिबाबतच्या भावना व्यक्त करताना एकीने सांगितले की–पुनर्विवाह हा जर विधवेसमोर एकच पर्याय असता तर मी अशा विवाहापेक्षा मरण पत्करणे पसंत केले असते.

### आर्थिक व सामाजिक प्रश्न

विधवांना समाजाकडून जी वागणूक मिळते त्याबद्दल बहुतेक विधवांनी नाराजी व्यक्त केली. या वागणुकीबरोबरच एक फार मोठे आर्थिक संकटही आ वासून उभे राहते. वास्तविक प्रश्न विधवेच्या भवितव्याचा असतो. परंतु स्वतः निर्णय घेण्यास ती बहुतेक वेळा असमर्थ असते. तिच्या सासर–माहेरच्या मंडळींकडूनच तिच्या भवितव्याचा निर्णय घेण्यात येतो. विधवांची मुले विशेषतः ती लग्न झालेली असतील तर आपल्या आईची उपेक्षा करतात असेही दिसून आले. पतिनिधनाची दुर्दैवी कुऱ्हाड कोसळली की मानसिक, सामाजिक, आर्थिक असे अनेक प्रश्न निर्माण होत असले तरी आर्थिक प्रश्न खरा 'आ' वासून उभा राहतो! पती नोकरी करणारा असला तरी त्याचे अचानक निधन झाल्यास त्याच्याजवळ म्हणण्यासारखी शिल्लकही नसते. विधवांच्या बाबतीत उपयोगी पडेल अशी योजना एकाही राज्य सरकारमार्फत राबविण्यात येत नाही असेही या पाहणीत निष्पन्न झाले. जवळजवळ ९२ टक्के विधवांना गंभीर स्वरूपाच्या आर्थिक संकटांना तोंड द्यावे लागते. नोकरी करण्याची इच्छा आणि ज्ञान असलेल्या विधवांपैकी जेमतेम १४ टक्के विधवांना त्यांचे प्रपंचाचे खटले चालू ठेवता येण्याइतपत योग्यतेच्या नोकऱ्या मिळू शकतात. उरलेल्यांची अर्थातच दारुण परवड होते.

त्यातही ग्रामीण भागात असलेल्या विधवांची परिस्थिती बरी असते. एक तर त्यांची जमीन वगैरे असते आणि ती नसलीच तर कुटुंबातील अन्य मंडळींचा आधार त्यांना मिळतो. याउलट शहरातील सारे वातावरण तुटक असते. नात्यागोत्यांचे संबंधही बेतास बात असतात. अशा परिस्थितीत ज्या वेळी वैधव्य येते त्या वेळी स्वाभाविकपणेच संकटांचा डोंगर उभा राहतो. विधवांच्या प्रश्नाबाबत विचारणा केली असता बहुतेकजणींनी सरकारने काही रोजगार विधवांना तातडीने उपलब्ध करून द्यावे, मुलांच्या शिक्षणाबाबत सवलती द्याव्यात याबाबतच्या मागण्या केल्या. निराधार विधवांना शासनाने पेन्शन द्यावे अशी मागणीही काही विधवांनी केली. विधवांनी लग्न केले तर उत्तमच; परंतु न केले तर त्यांना मानाने जगता यावे यासाठी शासनाने प्रयत्न करणे जरूर आहे. याबाबत जवळजवळ एकमत असले तरी कोणतेही राज्यशासन किंवा केंद्र सरकार याबाबत काहीही करीत नाही ही कडवट वस्तुस्थितीही अहवालाच्या अखेरी नोंदण्यात आली आहे. ◻

# अपराधी-निरपराधी : पृष्ठ ७ वरून

नेहमीचे उद्गार म्हणजे, 'अजी वकीलसाहाब, आप मेरी अदालत में अंदर कदम रखतेही आपकी चालसे मैं समझ जाता हूँ कि आपकी केस कितनी मजबूत है, कितनी सच्ची है!' हे मी जेव्हा प्रथम ऐकले तेव्हा मी दचकलोच होतो व 'येथले न्यायदान म्हणजे सत्त्वपरीक्षाच आहे तर!' असे वाटून घाबरलोच होतो; पण अनुभवाने मला हे समजायला लागले होते की, त्यांचे तथ्यनिर्णय, त्यांचा न्यायनिर्णय अचूक असायचा. न्यायव्यवहारशास्त्राची पंडिती विद्या पाजळून पानेच्या पाने लांब निर्णय त्यांनी लिहिविले नाहीत, तरी त्यांनी हेरलेले तथ्य व त्यावरून ठरविलेला न्याय जवळजवळ शंभर जरी नाही तरी नव्व्याणव टक्के बरोबर असे! एखादी-दुसरी चूक मानवी चूक म्हणून मी त्याचे काही वाटून घेत नसे.

माझ्या वकिली व्यवसायातले आरंभीचे उच्च न्यायालयातले प्रकरण म्हणजे नवीन वकिलाला उत्तेजन म्हणून दिले जात असलेले व अभियुक्ताला स्वतःचा वकील करण्याची ऐपत नसली म्हणजे त्याच्या बचावासाठी शासकीय खर्चाने देण्यात येणारे गरीब पक्षकाराचे वकिली कामाचे प्रकरण होते. मला ते प्रकरण एक नवीन वकील म्हणूनच मिळाले होते. अर्थात काम शिकायच्या दृष्टीने मिळालेली संधी म्हणून त्या कामात मी माझे सारे लक्ष घातले. प्रथम कोर्टाच्या फाइलींचे बारकाईने निरीक्षण केले. सेशन्स कोर्टातून मनुष्यवधाच्या आरोपाखाली दोष सिद्ध ठरविला जाऊन आजीवन कारावासाची शिक्षा मिळालेल्या एका तरुण खेडवळ पक्षकाराचे ते अपीलप्रकरण होते. अभियुक्त अपीलांट अक्षरओळख असलेला 'मोची' म्हणजे चांभारजातीचा मुलगा आहे हे फाइलीवरून मला कळले. तसेच फाइलीमधली एक गोष्ट मला प्रथमदर्शनीच जाणवली होती. अभियोगपक्षाचा म्हणजे पुलिसांचा पुरावा झाल्यावर सेशन्स कोर्टाने अभियुक्ताला विचारलेल्या प्रश्नोत्तरांपैकी एका प्रश्नोत्तराने माझे लक्ष चट्कन वेधून घेतले होते. प्रश्न होता की, 'पुराव्यावरून हे दिसते की, तू घटनेच्या दिवशी जंगलातल्या लाकडांची चोरी करीत असताना तुला... फॉरेस्टगार्डने पकडण्याचा प्रयत्न केला व तो ते करीत असता फॉरेस्टगार्डच्या मानेवर हातातली कुन्हाड मारून तू त्याचा खून केलास! याबद्दल तुझे काय म्हणणे आहे?' आणि त्या प्रश्नाचे अभियुक्ताने दिलेले उत्तर, 'मैं बेगुनाह (निर्दोष) हूँ. पुलिस की केस झूटी है. मैंने कोई लकडी नहीं चुराई. मैंने चोरी के इरादेसे कोई कतल (हत्या) नहीं किया. मैंने तो...' इतके लिहून उत्तर तेथे थांबले होते. त्यानंतर सेशन्सजजमहोदयांनी त्या अभियुक्ताला, 'कहो, क्या कहना चाहते हो?' असे काही म्हटले असावे. कारण पुढल्याच प्रश्नाच्या उत्तरात अभियुक्ताने, 'मुझे और कुछ नहीं कहना है' असे उत्तर दिले होते व बचावाचा काही पुरावा दिला नव्हता. पुलिसचे साक्षीदार खरे आहेत असे मानून सेशन्स कोर्टाने 'खून झाला; कुन्हाडीने खून झाला; घटनास्थळी शीशमच्या लाकडांची मोळी बांधलेली मिळाली. कुन्हाड अभियुक्ताची आहे असे दोन साक्षीदार सांगतात. घटनेच्या दिवशी रात्रीच अभियुक्त गावातून पळून गेला होता. अभियुक्ताने काही बचाव केला नाही की, पुरावाही दिला नाही.' वगैरे आधारावर त्या मोची मुलाला दोषी ठरवून खुनाच्या गुन्ह्याबद्दल आजीवन कारावासाची शिक्षा दिली होती!

वर दिलेल्या प्रश्नोत्तराने माझे मन चाळविले गेले होते व त्यामुळे मला स्वतः अभियुक्ताची भेट घ्यावी असे वाटले नी मी रीतसर कोर्टाची परवानगी घेऊन अभियुक्ताला भेटण्यासाठी म्हणून केंद्रीय बंदीगृहात गेलो व त्याला भेटलो. खेडयातला, २३-२४ वर्षांचा, सावळ्या परंतु तजेलदार वर्णाचा, तरतरीत चेहेऱ्याचा, निर्मळ नी स्वच्छ दृष्टीचा तो ५-५॥ फूट उंचीचा तरुण कैद्याच्या कपडयांत, पायांमध्ये दंडाबेडी घातलेली असा पण हसतमुखाने माझ्यासमोर आला नी 'पायालागी वकीलसाहाब!' म्हणून त्याने माझ्या पायांना हात लावून नमस्कार केला. त्याचे ते दंडाबेडीच्या लेण्यातले, कारावासातल्या कपडयांतले स्मितमुख बघून, मला त्याचे 'मैं बेगुनाह हूँ' (मी निर्दोष आहे) वगैरे उत्तर आठवले आणि मी मोकळ्या व जिव्हाळयाच्या स्वराने त्याला म्हटले की, 'तू मला खरे काय ते सांग! तू खरी गोष्ट कोर्टात सांगितली नाहीस हे मला समजले आहे. तू मला आपली खरीखरी कहाणी सांग! कोर्टातल्या फाइलीमधला पुलिसचा पुरावा मी पाहून घेईन. तू माझ्यावर विश्वास ठेवून खरे काय ते मला सांग!', असे बऱ्याचदा त्याला समजाविले. तेव्हा त्याने, 'वकीलसाहब! सच बात तो ऐसी है कि...' म्हणून जे काही सांगितले ते येथे सारांशानेच लिहितो. तो-त्याचे नाव मनुआ मोची. ज्या खेडयात तो रहात होता त्याच्या शेजारीच सरकारी जंगल होते. त्या जंगलात कामीदा म्हणजे कामास येणाऱ्या लाकडांची झाडे होती. गोंद, लाख वगैरे देणारी वड, पिंपळ व खैराच्या लाकडांची झाडे होती. त्याशिवाय शीशम लाकडाची देखील झाडे होती. शीशम म्हणजे शिसवी-लाकूड. वजनाने जड, बांधकाम, नक्षीकाम अशासाठी उपयोगी पडणारे मौल्यवान लाकूड. त्या भागातले ठाणेदार व त्या जंगलाची राखण करणारा वनरक्षक म्हणजे फॉरेस्टगार्ड एकाच जातीचे म्हणजे कारकुनाच्या गादीला बारमहा पिकणारे पैशाचे शेत समजणाऱ्या राजसंन्यास नाटकातील जिवाजीराव कलमदाते याच्याच जातीचे होते आणि त्यातच भर म्हणून जंगलाव्यतिरिक्त शेतजमिनीसाठी राजस्व म्हणजे महसूलखात्याचे जे पटवारी म्हणजे तलाठीमहोदय होते ते देखील ठाणेदार वनरक्षकाचे भाईबंदच! या तिघांनी नाना तऱ्हेचे उपद्व्याप करून रयतेला छळावे. त्यांचा नित्याचा उद्योग म्हणजे जंगलातले लाकूड चोरून विकायचा. आपल्या विश्वासातल्या माणसाकरवी व्यवसाय करावा व त्यातला नफा वाटून घ्यावा. खेडयातली गरीब निरक्षर जात योचा फायदा घेऊन स्वतःकरिताही पोटपाण्यापुरते मिळवीत. नफ्याचा मोठा अंश अर्थातच वनरक्षक आणि ठाणेदार यांच्या किंवा त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यासकट सर्वांमध्ये वाटला जाई. हे उद्योग जंगलाशेजारी वसलेल्या प्रत्येक खेडयामधून राजरोसपणे चालत असत. मनुआ मोचीच्या खेडयात राहणारे वनरक्षक व ठाणेदार वयाने तरुणच होते नी अपापाचा माल गपापा करण्याच्या उद्योगात


मस्त होत होते ! या मस्तीमुळेच त्या दोघांची दृष्टी गावातल्या तरुण बायकामुलींवर जाऊ लागली होती. मोची जातीतल्या बायका तशाच तरतरीत, नाकीडोळी नीटस्, चांगल्या बांध्याच्या असतात व त्यात मनुआ मोच्याची बायको विशेष देखणी होती. तिच्यावर त्या वनरक्षकाची नजर गेली होती व त्याने ठाणेदाराच्या दोन्ही अर्थानि काणाडोळा करण्याच्या भरोश्यानें स्वतःसाठी व ठाणेदारासाठीही मनुआच्या बायकोचा पिच्छा पुरवायला सुरुवात केली. वनरक्षकाची आपल्यावर वाईट नजर आहे अशा तक्रारी वनरक्षकाविरुद्ध वेग-वेगळ्या बायकांकडून पसरत राहिल्या होत्याच; पण त्या कळून सुद्धा मनुआने तिकडे लक्ष दिले नव्हते; जेव्हा खुद्द त्याच्या बायकोनेच वनरक्षकाबद्दल तक्रारी सांगायला सुरुवात केली तेव्हा मात्र मनुआ भडकला व निमित्त मिळताच त्या वनरक्षकाला चांगले चोपून काढायचे असा त्याने विचार केला व तो वाट बघत राहिला. अशा स्थितीत एके दिवशी त्याला बायकोने घाबरतच पण गुप्त बातमी म्हणून सांगितले की, 'उद्या सकाळी पहाटे अंधारातच जंगलातल्या त्या घळीजवळ मला बोलाविले आहे व तो मला म्हणतो आहे की, 'मी तुला शीशमच्या लाकडांची खूप मोठी मोळी देईन, त्याचे तुला व तुझ्या नवऱ्याला हजार पांचशे रुपये मिळतील. तू ये व माझे काम कर ! पुलिसांची सुद्धा भीति वाटू देऊ नको ! ठाणेदार सुद्धा तुझ्यावर फिदा आहे. तुला काही त्रास होणार नाही ! आमच्यावर विश्वास ठेव व आमचे काम कर ! मी तुला 'मालोमाल' – श्रीमंत – करून देईन !' वगैरे.

ही बातमी ऐकून मनुआचे डोके अर्थातच भडकले व गावातल्या सगळ्या बायकांचा त्रास आपणच का मिटवू नये ? एकदा चांगला मार खाल्ला म्हणजे हा पाजी वनरक्षक धडा शिकेल व सगळ्या बायका धीट होतील.' असा विचार करून त्याने झटपट बेत आखला. त्याने आपल्या बायकोला धीर देऊन म्हटले की, 'तू पहाटे पुढे जा. मी तुझ्या पाठोपाठ लपून येईन व तो भेटताच मीच त्याचा समाचार घेईन ! तू मुळीच घाबरू नकोस !' मनुआची बायको मनुआसाठी आधीच प्राण टाकीत होती आणि मनुआचा हा धीट निश्चय पाहून तिलाही धीर वाटला व दोघांचा बेत पक्का ठरला. वनरक्षक भेटताच मनुआने त्याचा समाचार घ्यायला सुरुवात करायची व तेव्हा मनुआच्या बायकोने मागल्या पावली जंगलातून परत आपल्या घराकडे निघून यायचे, असा विचार ठरवून मनुआने संध्याकाळी आपल्या मित्रमंडळींना सांगितले की, तो उद्या भल्या पहाटेच तालुक्याच्या गावी जाणार आहे. कारण तेथे त्याचा मामा आपल्या गावाहून येणार आहे. त्याला भेटायला जायचे आहे. तालुक्याचे गाव त्या खेड्यापासून आठ मैल दूर होते. म्हणून मनुआ कोंबड्याने पहिली बांग देताच घरून निघणार आहे असे दोन-चार जणांना त्याने सांगून ठेविले.

ठरल्याप्रमाणे घटनेच्या दिवशी मनुआने पहाट होणार असे दिसताच आपल्या बायकोला घेऊन तो जंगलाकडे गेला व जंगलाच्या हद्दीत शिरताच बायकोला पुढे घळीकडे जायला पाठविले व स्वतः तिच्या पाठोपाठ लपतलपत गेला. वनरक्षक रात्रीचाच जंगलात गस्त घालायला म्हणून गेलाच होता. मनुआ आपल्या पाठीशी आहे अशा विश्वासाने मनुआची बायको धीटपणे जंगलातल्या घळीकडे चालत गेली. तिच्या पाठीमागे मनुआही जात होता. मनुआच्या हातात हत्यार असे काही नव्हते. साधी काठीसुद्धा त्याने घेतली नव्हती नी स्वतःच्या मनगटांवर तो विश्वासून होता. घळी जवळ येताच मनुआने आपल्या बायकोच्या नावे वनरक्षकाने घातलेली साद ऐकली. तशी मनुआने धावत पुढे जाऊन बायकोला परत घरी जायला सांगितले आणि स्वतः पुढे जाऊन पाहिले तो वनरक्षकमहाशयांनी शिसवीच्या लाकडांची चांगली चार-पाच मणांची मोळी तेथे बांधून तयार ठेवली होती व वनरक्षक स्वतः तेथे हातात आपली वर्दीची कुऱ्हाड घेऊन उभा होता. मनुआ वनरक्षकाने केलेली सर्व तयारी पाहून न भडकता तर नवलच ठरले असते ! मनुआने, 'साल्या ! तुला माझी बायको पाहिजे ना ? थांब, माझ्या बायकोवर तू हात टाकण्याचे अगोदर माझाच हात कसा आहे ते तुला दाखवतो ! त्या मोळीला हात लावून माझ्या बायकोचा हात तुझ्या हातात द्यायला मी काही षंढ नाही ! पाहूनच घे !' असे म्हणत वनरक्षकावर तो उडी घेऊन धावत गेला आणि मनुआने वनरक्षकाला हातानेच मारायला सुरुवात केली. ते बघून वनरक्षकाने मनुआचा मार चुकविण्यासाठी आपल्या हातातली कुऱ्हाडच मनुआच्या अंगावर मारण्याच्या हेतूने उगारली व मनुआवर ती कुऱ्हाड वनरक्षक मारणार तोच मनुआने चपळाईने उडी मारून वनरक्षकाच्या हातातली कुऱ्हाड हिसकावून घेतली व जो मनुष्य आपल्याला जिवे मारायला देखील तयार होतो आहे त्याला नुसता हाताचा दणका देणे पुरेसे नाही, त्याला कुऱ्हाडीच्या दांड्यानेच दणका दिला पाहिजे असा विचार करून मनुआने ताडकन् कुऱ्हाडीचे पाते उलटे केले व घाईने दांड्याचा दणका वनरक्षकाच्या पाठीवर मारायला नेम घेतला व उलटी कुऱ्हाड हाणली. मनुआचा अंदाज होता की कुऱ्हाडीच्या दांड्याचा दणका वनरक्षकाच्या पाठीवर बसेल; पण त्याच वेळी वनरक्षक जमिनीवरून काही तरी घ्यायला म्हणून खाली वाकला आणि मनुआने घाईगर्दीत कुऱ्हाड पात्याच्या बाजूने न धरता केवळ पातेच उलटे केले होते व तशीच कुऱ्हाड हाणली होती. तिचा वार कुऱ्हाडीच्या लोखंडी चौकटीच्या बाजूचा वनरक्षकाच्या मानेवर लागला होता. अगदी मानेच्या वरच डोक्याच्या पाठीमागे लागला होता ! त्या लोखंडी चौकटीच्या माराने वनरक्षक क्षणभर उभा होऊन स्वतःच्या पाठीवर कोसळला होता. ते पाहताच मनुआने वनरक्षकाची कुऱ्हाड तेथेच टाकून दिली व मनुआने तेथून पळ काढला. तो गावाच्या दिशेने न जाता तालुक्याच्या गावाकडे आठ मैलांचे ते अंतर तो पळतच धावून गेला आणि उजाडण्याच्या वेळेस तालुक्याच्या गावाजवळ पोचला होता.

इकडे मनुआची बायको जंगलातून परतली ते आपल्या नवऱ्याच्या हिंमतीकडे व स्वतःवरल्या प्रेमाकडे बघून आनंद वाटूनच ! ती घाई-घाईने अंधारातच गावाकडे परत येत होती; पण मध्येच एके ठिकाणी समोरून कुणी येत असल्याची तिला चाहूल लागली होती म्हणून ती वाट सोडून एका झुडुपापाठीमागे लपली व ते येणारे माणूस घळीकडे निघून जाताच ती झुडुपाबाहेर येऊन तिने गावची वाट धरली; पण या घटनेने ती घाबरली होती व आता मनुआचे काय होणार ही काळजी तिला वाटू लागली. अशा काळजीतच कशीबशी ती गावात व घरी पोचली. चाहूल लागलेल्या माणसाकडे झुडुपात बघताना उगीचच एक विचार तिच्या मनाला चाटून गेला

# नव विवाहितांनो !
# उद्या, पस्तावा करण्याची
# वेळ न आलेलीच बरी !



**तुम्हाला संभव वाटणार नाही, अशा काळातहि मुलें होऊ शकतात. विवाह-- झाल्या दिवसांपासूनच कुटुंब कल्याण साधनांचा वापर करण्यास सुरवात करा**

नवविवाहित जोडप्याच्या जीवनात, अचानक, अन् अनपेक्षित गर्भारपण म्हणजे, साऱ्या योजनांचा चक्काचूर ! इतरांच्या बाबतीत असं अनेक वेळां घडलं आहे. तीच चूक तुम्ही करणं, शहाणपणाचं ठरेल काय ? रोग निवारणापेक्षा रोग प्रतिबंध बरा, हे लक्षात ठेवा. म्हणून केवळ योगायोगावर भरवंसा न ठेवता, परिस्थिती आपल्या काबूत ठेवा. आपल्या मधुचंद्राच्या रात्रीं पासूनच एका चांगल्या संवयीचा मुहुर्त करा. निरोध वापरा. पुरुषांनी वापरावयाचें ते सोपे आणि सुलभ साधन आहे. तुम्हाला निरोध शेजारच्या औषध विक्रेत्याकडे अथवा नजीकच्या कुटुंब कल्याण केन्द्रांत मिळू शकेल. कुटुंब कल्याणाच्या अन्य पद्धतींच्या बाबतीत योग्य सल्यासाठीं जवळच्या कुटुंब कल्याण केन्द्रात विचारण करा

**आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी आजच नियोजन करा**

davp 77/218

होता की हा माणूस कुठे ठाणेदार तर नव्हता ?

तो ठाणेदारच असावा ही मनुआची कल्पना व मनुआ जेव्हा जंगलातून पळाला तेव्हा वनरक्षकाच्या छातीत थोडी धुगधुगी असावी व तो वनरक्षक विव्हळत असावा असे त्याचे म्हणणे. अशा स्थितीतच ठाणेदार वनरक्षकाजवळ पोचला असावा व त्या वनरक्षकाने मनुआचे नाव घेतले असावे. तेथे ठाणेदाराने वनरक्षकाला वाचविण्याची काही खटपट वा काळजी केली की नाही ते मनुआला काही माहीत नव्हते. बहुधा ठाणेदारसाहेब एकंदर बनावाला घाबरून तेथून अंधारातच ठाण्यावर परतले असावेत—वनरक्षकाला तसेच मरणासन्न अवस्थेत तेथे सोडून !

सकाळी सुमारे नऊ-दहा वाजता गावामध्ये बातमी पसरली की, जंगलात वनरक्षक मरून पडला आहे—कुऱ्हाड चिखलात पडली आहे—वनरक्षकाच्या तोंडातून रक्त आले आहे—शीशमच्या लाकडांची चार-पाच मणांची मोळी तेथे बांधलेली पडली आहे इत्यादी. सकाळी दहा वाजल्यानंतर ठाणेदारसाहेबांनी वनरक्षकाचा जंगलात खून झाल्याबद्दलची प्रारंभिक बातमी. ती आणणाऱ्याच्या नावे लिहिली व स्वतः पंचसाक्षीदार घेऊन जंगलात जाण्याकरिता रवाना होत आहे असा स्वतःच रिपोर्ट लिहिला व काही साक्षीदारमंडळींना घेऊन तो घटनास्थळी पोचला. तेथे रीतसर मृत माणसाच्या शरीराची तपासणी झाली. जागेचे, हत्याराचे, कपड्यांचे निरीक्षण झाले. दर्शनी तपासणीत पंचांना मयताच्या केसात कुठे रक्त साखळलेले दिसले नाही की ओठावर, गालावर, मानेवर, दातांवर अथवा शरीरावर कुठेही चिरलेली जखम दिसली नाही. कुऱ्हाडीचे पाते स्वच्छ होते. पात्यावर अथवा कुऱ्हाडीच्या दांड्यावर कोठेही रक्ताचा डाग दिसत नव्हता. पात्याच्या लोखंडी चौकटीला उलट्या बाजूने चिखल लागला होता. तोंडातून वाहिलेले रक्त मानेवर पसरून वनरक्षकाच्या वर्दीच्या कोटाची गळ्याची बाजू रक्ताने डागळली होती. इतर सारे कपडे स्वच्छ होते. मोळीची तपासणी झाली. मोळीतली लाकडे नुकतीच कापलेली नव्हती—ठेवणीतली होती. मोळीचे वजन पाच मणांच्या वर खचित होते. एका माणसाला डोक्यावर वाहून नेण्यासारखे नव्हते. इत्यादी कार्यवाही झाल्यावर ठाणेदाराने मयताचे शरीर ताब्यात घेऊन ताबडतोब जिल्ह्याच्या गावी शवाची मरणोत्तर तपासणी करण्यासाठी जिल्ह्याच्या सरकारी दवाखान्यात पाठविले व बरोबर शंका न राहावी म्हणून कुऱ्हाडही पाठविली. ह्या वेळपर्यंत मयताच्या तोंडातून रक्त का आले आहे याचा त्यांना अंदाज लागला नव्हता. खून कोणी केला असावा याची खूण मिळण्यासारखे घटनास्थळी काही मिळाले नाही, काही दिसले नाही. ठाणेदाराने परत येऊन मनुआची चौकशी केली; परंतु मनुआ गावात नव्हता. तो आदल्या रात्रीच तालुक्याच्या गावी निघून गेला होता असे त्याच्या इष्टमित्रांनी सांगितले; पण ठाणेदाराने मनुआ फरार झाला आहे असा रिपोर्ट ठाण्याच्या रोजनिशीत लिहिला व मनुआ कोठे गेला याची मनुआच्या बायकोलाही काही माहिती नाही असाही दाखला रोजनिशीत लिहिला.

हे खरेही होते. सकाळपर्यंत मनुआच्या बायकोला जंगलात वनरक्षकाचा कुऱ्हाडीने खून झाल्याची बातमी कळली होती व ती कळताच मनुआच्या बायकोचे धाबे दणाणले होते. कारण एक तर ती जंगलातून परत एकटीच येत असता जंगलात जाणाऱ्या आणखी एका माणसाची चाहूल तिला लागली होती व तो माणूस ठाणेदार असावा अशी शंका तिला होतीच. म्हणून ती तोंड दाबून गप्प राहिली व पुढे काय होणार आहे याची कल्पना करीत व काळजी वाटून मनुआची वाट पाहात होती. काही वेळाने पंचसाक्षीदारांच्या सांगण्यावरून मनुआने कुऱ्हाडीने खून केला असावा अशी शंका येण्याजोगे घटनास्थळी अथवा तोपर्यंत काही मिळाले नव्हते हे तिला कळले म्हणून ती आणखीच अबोल होऊन श्वास रोखून मनुआची वाट पाहू लागली होती.

दोन-तीन दिवसांनी मनुआला घटनेच्या दिवशी तालुक्याच्या गावी सकाळी हलवायाच्या दुकानावर दूध पिताना व काही खाणे-पिणे करताना काही लोकांनी पाहिले होते असे कळले; पण पुढे तो कोठे नाहीसा झाला याचा पत्ता लागला नाही. आठ दिवसांनी मनुआ एकाएकी गावात आला नि घरी झोपून राहिला. त्याने आपल्या बायकोला सांगितले होते की, तालुक्याच्या गावात मामाला भेटून तो मामाच्याबरोबर मामाच्या गावी निघून गेला होता व तेथे ५-६ दिवस राहून तेथूनच घरी परत आला होता आणि फार थकल्यामुळे झोपला होता.

या आठ दिवसांत ठाणेदाराला काही सुचेनासे झाले होते. एकीकडे मयताचा खुनी कोण याचा आपण पत्ता लावू शकत नाही याने ते घाबरे झाले होते व दुसरीकडे आपण पहाटेच जंगलात गेलो व आलो हे कोणी पाहिले तर नाही अशी शंका त्यांच्या मनाला चाटून जात होती व आपण कामातुर होऊन भय व लाज सोडून त्या वेळी जंगलाकडे का गेलो याची त्यांच्या मनाला खंत वाटत राहिली व त्याच वैफल्याच्या तारेत ठाणेदाराने खुनाच्या केसचा आराखडा जुळवायला आरंभ केला. घटनास्थळी मयताचा खून कोणी केला याची खूण मिळत नव्हती. खून कुऱ्हाडीने केला असे म्हणायला कुऱ्हाडही काही खूण दाखवीत नव्हती. लाकडांची मोळी ठेवणीतल्या लाकडांची होती व ती जशीच्या तशी बांधलेली होती. तिची चोरी एक माणूस करणे अशक्य होते. एका माणसाने खून केला असे म्हणायला ती कुऱ्हाड खुनी माणसाचीच आहे असे म्हणणे क्रमप्राप्त होत होते व तोच सरळ मार्ग ठाणेदाराने हाताळला. तोवर सरकारी दवाखान्यातून शवाच्या उत्तरीय तपासणीवरून कळले होते की, मयताच्या डोक्यावर पाठीमागच्या बाजूने मानेवर ' कठीण बोथट ' हत्याराचा मार बसला होता. तो शरीर कशावर तरी आदळल्यामुळे किंवा दांडके किंवा लोखंडी सळई डोक्यावर मारल्याने अशी मुकी जखम होणे शक्य होते असे कळले. कुऱ्हाडीवर रक्ताचे डाग कोठेच मिळाले नाहीत. चिखलात सुद्धा नाहीत वगैरे रिपोर्टात लिहिले होते. ठाणेदाराने स्वतःवर काही शिंतोडा उडू नये या काळजीतच खुनाच्या केसचा आराखडा साधासुधा तयार केला. तोवर मनुआ गावात आला होता. त्याला संशयीत खुनी म्हणून बंदी बनवून ठाणेदाराने केस साधी अशी सजविली. मयताच्या शरीराजवळ सापडलेली कुऱ्हाड मनुआची आहे असे सांगणारे दोन साक्षीदार उभे केले. ते ठाणेदाराच्या लाकडाच्या चोरीच्या व्यवहारातले दोन हस्तकच होते. त्यातलाच एक साथीदार मयत वनरक्षक खुनाच्या आठ-दहा दिवस अगोदर मनुआच्या विरुद्ध आपणाजवळ तक्रार असल्याबद्दल सांगत

होता. म्हणजे मनुआच्या लाकडे चोरी करण्यामुळे वनरक्षक रागावलेला होता. मनुआ जंगलातली लाकडे चोरून विकीत असे, असे सांगणाराही एक साक्षीदार उभा केला. मनुआ फरार झाला होता हे सांगायला एक पोलीस-शिपाई होताच. तालुक्याच्या मॅजिस्ट्रेटने खून झाला आहे, कुऱ्हाड मनुआची आहे, असा पुरावा आहे, मनुआ घटनेच्या दिवसापासून ८-१० दिवस फरार झाला होता यावरून प्रथमदर्शनी केस सेशन्स कमिट करण्याची आज्ञा लिहून आपले हात मोकळे केले.

सेशन्सजज्जमहोदयांच्या कोर्टात मनुआच्या फरारीचा, मयताच्या डॉक्टरी तपासणीचा घटनास्थळी बनलेल्या पंचनाम्याचे साक्षीदार व कुऱ्हाड मनुआची आहे असे सांगणारे व ती ओळखणारे दोन दलाल व मयत वनरक्षक मनुआविरुद्ध त्याच्या लाकडे चोरण्याबद्दल नेहेमी तक्रार करीत असे, असे सांगणारे दोन गाववाले असा पुरावा आला होता. सेशन्स कोर्टात मनुआचे वतीने एक अकिंचन अभिभाषणपत्र घेणारे (Paceper Brief Holder) वकील उभे झाले होते; पण त्यांनी केसकडे विशेष लक्ष दिले नसावे असे मला वाटले. कारण त्यांनी साक्षीदारांना रटाळ प्रश्न विचारण्याशिवाय आणखी काही बारकावे पाहिले नव्हते व मनुआचा बचाव हिरीरीने केला नव्हता. मनुआचा स्वतःचा जबाब वर लिहिल्याप्रमाणे, 'मैं तो बेगुनाह हूँ,– मी निर्दोषी आहे, मी लाकडे चोरली नाहीत, मुद्देमाल कुऱ्हाड माझी नाही– चोरीच्या हेतुने मी मयताचा खून केला नाही. पोलिसची केस खोटी आहे– मी तर ... मला आणखी काही सांगायचे नाही.' असा होता. सेशन्सजज्जमहोदयांनी विशेष भानगडीत न पडता समोर आलेल्या पुराव्यावर 'निःसंदेह विश्वास' IMPLICIT FAITH ठेवला! 'मनुआने काही बचाव सांगितला नाही. बचावाचा पुरावा दिला नाही. फिर्यादी पक्षाचा पुरावा खरा का नाही हे अभियुक्ताकडून दाखविले गेले नाही, सिद्ध केले गेले नाही.' अशी नेहमीची तर्कपद्धती लिहून मनुआवर खुनाचा आरोप सिद्ध झाला आहे असे ठरवून त्याला आजीवन कारावासाची म्हणजे चौदा वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा दिली व एक सेशन्स केस निकालात काढल्याचे श्रेय मिळविले.

जेलमधून मनुआने जेल-अधिकाऱ्याच्या मदतीने एक जेल अपील लिहून पाठविले. असले जेल अपील म्हणजे बंदीगृहातल्या कार्यालयामधला कोणी निम्नश्रेणी अधिकारी अथवा लिपिक सरावाने जी कामे करायला शिकतो व कारकुनाच्या गादीच्या शेताची मशागत करून बारमहा पैशाचे पीक काढण्याचा प्रयत्न करीत असतो, त्याच वैधानिक परामर्शाच्या Legal AID च्या किंमतीचे होते. कसे का होईना, मनुआचे अपील उच्चन्यायालयामध्ये विचारार्थ स्वीकार झाले होते. रीतसर मला अकिंचन-वैधानिक-परामर्शदाता नेमले गेले. मी बंदीगृहामध्ये अभियुक्तबंद्याला–मनुआला भेटलो. त्याची कहाणी ऐकली. मी त्याला विचारले की, 'तू आपल्या बायकोकडून खरी हकीकत सांगून मयताच्या वागणुकीचे दोन साक्षीदार सेशन्स न्यायालयात उभे का नाही केलेस? तर त्याचे म्हणणे, 'मी माझ्या बायकोचे नाव विटाळणार नाही. खोटा पुरावा देणार नाही. वनरक्षकाची हत्या करण्याचा माझा हेतू नव्हताच मुळी! मी जंगलात रिकाम्या हाताने गेलो होतो. मयत वनरक्षक मला कुऱ्हाड मारण्याच्या बेतात होता, म्हणून त्याची कुऱ्हाड मी हिसकावून घेतली व कुऱ्हाडीच्या दांड्याचा दणका त्याच्या पाठीत मारला होता; पण ईश्वराच्या घरचा न्याय निराळा होता. माझ्या हातून ईश्वराने हलकट वनरक्षकाचा न्याय केला आहे. माझ्या हातून हत्या झाली असली तरी मी निरपराध आहे!' हे सांगतानाचा मनुआचा तळपणारा चेहेरा–लकाकणारे डोळे पाहून मी तर थक्क झालो होतो. माझ्या मनात त्या चिरंजीव न्यायाधीशमहोदयांचे शब्द घोळत होते. ते आठवूनच मी मनुआला म्हटले की, 'सगळेच अभियुक्त मी गुन्हा केला नाही, मी निर्दोष आहे, असे तोंडाने म्हणतात; पण जज्जसाहेबांच्या डोळ्याला डोळा देण्याची त्यांची हिंमत होत नाही! जज्जसाहेबांसमोर खाली मान घालतात. त्यांचे मन त्यांना खात असते.' त्यावर मनुआने तडफेने मला म्हटले, 'वकीलसाहाब! मैं सही मानो में बेगुनाह हूँ, मेरा कतल करनेका इरादाही नहीं था, न मैंने कतल करनेके लिए मक़तूल पर कोई हमला किया। कोई भी चाहे जितनी मुझसे आँखे लढाले. मेरी गर्दन तो क्या? मेरी आँखे भी नहीं झुकेंगी! मैं सजा भुगत लूंगा! दसबारह सालमें छूटकर बाहर आ जाऊँगा. मेरी घरवाली पक्की है. वह मेरी राह देखती रहेगी। मुझे पूरा भरोसा है। आप अपनी वकालत जैसी बने वैसी करलो!' मराठीमध्ये मनुआचे शब्द अशा अर्थाचे, 'वकीलसाहेब! खरंच मी निर्दोषी आहे. खून करण्याचा माझा हेतू नव्हताच मुळी! न मी खून करण्यासाठी मयतावर कोणताही वार केला. कोणीही वाटेल तितके माझ्याकडे बघेना का? माझी मान तर काय, माझी दृष्टीदेखील नमणार नाही! मी शिक्षा भोगेन! दहा-बारा वर्षांनी सुटून येईन. माझी बायको घट्ट आहे! ती माझी वाट पाहील. मला पूर्ण विश्वास आहे. आपल्याकडून होईल तशी आपण आपली वकिली करून पाहा!'

मी घरी येऊन सगळे प्रयत्न करायचे ठरविले. मनुआची केस चिरंजीव न्यायाधीशमहोदयांच्या बेंचवर सुनावणीस निघावी यासाठीही प्रयत्न करावयाचा. ईश्वराने माझी पण मनुआचीच हाक ऐकली असावी. रीतसर मनुआची केस चिरंजीव न्यायाधीश व त्यांच्या जोडीला आणखी एक न्यायाधीश अशा उच्च न्यायालयाच्या खंडपीठासमोर म्हणजे डिविजनबेंचसमोर केस सुनवाईला निघेल असे सूचनाफलकावरून माहीत झाले! माझ्या थोड्याफार पूर्वानुभवानुसार खंडपीठावर चिरंजीव न्यायाधीशमहोदयांच्या जोडीला जे न्यायाधीशमहोदय येणार होते ते राजस्वविभागात म्हणजे रेव्हेन्यूखात्यात बरीच वर्षे काम केलेले नि न्यायाची हार्दिक चाड असलेले म्हणून मला ठाऊक होते व माझा हाही अनुभव होता की, खंडन्यायपीठावर चिरंजीव न्यायाधीश असले की, त्यांच्याबरोबर खंडपीठावर बसलेल्या न्यायाधिशांना गप्पच बसावे लागे. चिरंजीव इंग्लंड-रिटर्न्ड होते, संस्थानचे अनेक कायदे बनविणाऱ्या मरहूम वडिलांचा वारसा मिळालेले होते. याशिवाय स्वच्छ मनाचा आत्मविश्वासही होता. इत्यादींमुळे चिरंजीव न्यायाधीश म्हणतील तोच–तसाच निर्णय व्हायचा. बरोबरीचे न्यायाधीश बहुधा स्वतःचे मत न लिहिता चिरंजीव न्यायाधिशाच्या लिहिलेल्या निर्णयाखाली 'मी सहमत आहे' असे लिहून सही करावयाचे. केस पुढल्या आठवड्यात बोर्डावर येणार असे कळताच मी पुन्हा निरीक्षण केलेल्या कोर्टाच्या

फायलीवरून मला दिसलेले मुद्दे–पोलिसची केस कशी बनावट असावी, मरणोत्तर डॉक्टरी तपासणीचा रिपोर्ट पाहून त्यावरून मेंदूला कसला तरी जबरदस्त मार लागून आतल्या आत रक्तस्राव होऊन त्याने मरण आले, यावरून मनुष्य पाय घसरून खाली कठीण दगडाच्या कातळावर आपटून त्याच्या डोक्याला इजा झाली असण्याची शक्यताही होऊ शकते, सेशनजज्जमहोदयांनी याकडे लक्ष दिलें नाही किंवा अधिक चौकशी केली नाही किंवा त्यांना केस समजलीच नाही, सेशन्स कोर्टामध्ये वकिलाची चांगली मदत मिळाली नसावी वगैरे मुद्द्यांना धरून आपले तर्कनिवेदन–आर्ग्युमेन्ट करावयाचे असे ठरवून दैनिक पेशी–सुनवाईची वाट पाहात राहिलो. दैनिक सूचीवरून दिवस कळताच त्या दिवशी लवकर कोर्टात जाऊन अपीलांट मनुआची बंदीगृहातून कोर्टात आणला जाण्याची वाट पाहात राहिलो. मनुआला दोन पोलिसांनी दंडाला काढण्या बांधून कोर्टाच्या दारापाशी आणला तेव्हा मी तेथेच उभा होतो. मनुआने मला ‘पायालागी’चे वंदन करताच मी त्याला त्या दोन पोलिसांसमक्षच हसत म्हटले, ‘भगवान का नाम लो और आँखे लड़ाने के लिये तय्यार रहो !’ माझे विलक्षण बोलणे ऐकून ते दोन्ही पोलीस शिपाई माझ्याकडे ‘आ’ वासून बघतच राहिले होते ! मनुआच्या चेहऱ्यावर मात्र निरागस स्मित उजळले होते.

रीतसर कोर्टबेंच येऊन कामकाजाची सुरुवात झाली. प्रारंभिक दरखास्ती मनाई हुकुमाबद्दलची प्रार्थनापत्रे, नवीन अपिले, रिविजन्स वगैरे विचारार्थ स्वीकार करणे वगैरे काम आटपताच मनुआची केस आजीवन कारावासाच्या बंद्याचे बंदीगृहअपील म्हणून प्रथम पुकारली गेली. पोलिसांनी मनुआच्या काढण्या सोडून त्याला आरोपितांच्या पिंजऱ्यात उभे केले व स्वतःही दोन बाजूला अदबीने–पण दक्ष उभे राहिले. मीही ‘श्रीमान महोदय !’ म्हणून माझे निवेदन करायला उभा राहिलो. मी केस-प्रकरणाच्या एकएक घटना दिनक्रमाने सांगताच, न्यायपीठावरून शिरस्तेदाराला आज्ञा झाली की, ‘पहिले अदालतमातहतका फैसला सुनाओजी !’ (प्रथम अधीनस्थ न्यायालयाचा निर्णय वाचून दाखवा बरे !) निर्णयवाचन झाले. चिरंजीव न्यायाधिशांनी नाव घेतलेल्या साक्षीदारांचे कथनही वाचले गेले. अपीलांट अभियुक्ताच्या प्रश्नोत्तरांचे वाचन झाले. मी पहात होतो. चिरंजीव न्यायाधिशांचे अपीलांट बंद्याकडे निरखून बघणे चालू होते. प्रकरणवाचन ऐकणेही चालू होते. विशेषतः मनुआच्या जबाबातले ते वाक्य, ‘मी निर्दोष आहे......मी तर......मला काही सांगायचे नाही’ वगैरे वाक्ये ऐकून न्यायाधीशमहोदयांनी कान टवकारले होते व ‘क्या ? यह जबाब फिरसुनाओजी !’ (काय ? हे उत्तर पुन्हा ऐकवा बरे !) म्हणून शिरस्तेदाराकडून ते वाक्य पुन्हा वाचून घेतले होते. या साऱ्या सुनवाईमधूनही समोर उभ्या असलेल्या बंदी अपीलांटकडे निरखून बघणे चालू होते. कोर्टातल्या या दृष्टिपरीक्षणाकडे मी पहात होतो; पण मनुआकडे मान वळवून मी मुळीच बघितले नाही. मला पूर्ण विश्वास होता की मनुआची मानच काय पण त्याची दृष्टीसुद्धा कसल्याही विचाराने नमणार नाही ! प्रकरणाच्या पत्रावलीचे-मिसलेचे वाचन संपल्यावर सहाजिकच पोठावरून प्रश्न आला की, ‘अब कहिये वकीलसाहब ! आपका क्या कहना है ?’ (हं ! आता बोला वकीलसाहेब! आपले काय म्हणणे आहे ?) मी एकएक करून पुलिसची केस कशी बनावटी आहे हे सांगायला सुरुवात केली ‘शिसवीच्या लाकडाची पाच मणांची मोळी कोणी गामागुंगा पहिलवानसुद्धा डोक्यावरून नेऊन दोन-तीन मैल चालत जाणार नाहीत. मयताच्या अंगावर माराच्या खुणा नाहीत. कातडी कापून कुठेही रक्त वाहिलेले नाही. डोक्यावर केसांमधे पाठीमागून मुका मार लागला आहे. असा मुका मार जंगलामधे पाय घसरून पाठीवर दाणकन् आदळल्यामुळेही बसण्याची संभवनीयता आहे. कुऱ्हाड अपीलांट–बंद्याची आहे हे सांगणारे साक्षीदार खोटे बोलतात. कुऱ्हाडीवर रक्ताचे डाग कोठेही नाहीत. कुऱ्हाडीच्या दांड्यावर नाहीत, कुऱ्हाडीच्या पात्यावर नाहीत. नुसता पाठीमागच्या चौकटीवर चिखल लागला आहे. कारण घळीच्या चिखलात पडलेली सापडली-हे म्हणत होतो तेव्हाच पीठावर बसलेल्या जोडीदार न्यायाधीशमहोदयांनी कोर्टासमोर आणलेल्या मुद्देमालातून ती कुऱ्हाड पहायला मागितली व कुऱ्हाड स्वतःच्या हातात घेतली. लहानशीच होती. तीन बोटे रुंदीचे सुद्धा पाते नव्हते. पात्याची चौकट फार तर तीन चौरस इंच जाडीची होती. राजस्वविभागात सगळी सेवा ह्यात घालविलेल्या त्या न्यायाधीशमहोदयांना कसले तरी औत्सुक्य वाटून त्यांनी कोर्टाच्या शिपायाला एक ओला कपडा आणायला सांगून त्याच्याकडून कुऱ्हाडीच्या चौकटीवरचा चिखल पुसायला त्याला सांगितला व तो पुसला जाताच त्यांनी पात्याच्या चौकटीची मागली बाजू निरखून बघायला सुरुवात केली. नीट दिसेना म्हणून शिरस्तेदाराच्या टेबलावरला मोठा मॅग्निफाइंग ग्लास चित्र–लेख मोठे करून दाखविणारे भिंग–मागितला. तो हातात घेऊन त्यांनी पुन्हा चौकट नीट पाहिली. मी बघितले, त्या न्यायाधीशमहोदयांचा चेहरा एकदम आनंदला होता. काही न बोलता त्यांनी ते भिंग व ती चौकट चिरंजीव न्यायाधीशमहोदयांच्या हातात दिली. चिरंजीव न्यायाधीशमहोदयांनीही भिंगातून ती चौकट पाहिली नी एकदम त्यांच्या तोंडातून उत्स्फूर्त उद्‌गार बाहेर पडला की, ‘अब्बाजान कहा कहते थे कि झूट सिरपर चढकर बोलता है !’ कारण रेव्हेन्यू विभागामधून न्यायपीठावर आलेल्या न्यायाधीशमहोदयांना आपला विभागीय अनुभव आठवला होता व त्यांनी वनरक्षकाच्या वर्दीच्या कुऱ्हाडीवरचा सरकारी शिक्का आहे की नाही याची खात्री करून घेतली होती !

मी हे सगळे श्वास रोखून पहात होतो. भिंगातून कुऱ्हाडीवरचा शिक्का तपासून झाल्यावर दोन्ही न्यायाधीशमहोदय आपापल्या आसनावर पाठीमागे रेलले. मी त्याच वेळी मनुआकडे दृष्टी टाकली. त्याचा चेहेरा जसाच्या तसा उजळलेला नी तो हात जोडून न्यायपीठाकडे बघत होता. मला अधिक काही बोलण्याची आवश्यकताच वाटली नाही. मनुआ आदल्या रात्रीच फरार झाल्याबद्दल पुलिसांची नोंद खरी असण्याजोगी काही परिस्थिती समोर आली नाही. मनुआ आठ दिवसांनी आपण होऊन गावात परत आला होता. त्याला झोपलेला उठवून पुलिसांनी पकडले होते यावरून मनुआविरुद्ध कोणताही विपरीत तर्क काढणे अन्यायाचे आहे’ वगैरे म्हणून आपले तर्कनिवेदन मी आवरते घेतले. चिरंजीव न्यायाधीशमहोदयांनी मनुआला विचारले, “तुमको और कुछ कहना है ?” मी त्याकडे पाहिले तर मनुआ त्याच निरागस चेहेऱ्याने म्हणत होता की, ‘नहीं हुजूर ! मुझे कुछ नहीं कहना. मेरा इन्साफ भगवान आपको हाथोंसे करेगा !’

न्यायाधीशमहोदयांनी शान्तपणे सरकारी वकिलांना त्यांचे प्रतिनिवेदन करण्यास आवाहन केले. सरकारी वकीलमहोदयांनी पीठावरचे वाचनश्रवण–मुद्देमाल परीक्षण वगैरे स्वत: ऐकले व पाहिले होतेच आणि त्यामुळे त्यांचा आवाज तसाच कच्चा पडला होता तरी त्यांनी पुलिसचे साक्षीदार कसे खरे आहेत. कुऱ्हाड मनुआची आहे हा सेशन्समहोदयांचा तथ्य निर्णय आहे. Finding of fact आहे. मनुआ कसा आठ दिवस फरार झाला होता...असे बोलताच चिरंजीव न्यायाधीशमहोदय उसळले होते ! ते ताठ बसत म्हणाले, 'तो क्या वह अपने आपको पकडवा लेता–पुलिस के हाथों पिटवा लेता–और पुलिस के केस का इकबाल लिखा देता ? हमे और कुछ दूसरी बात बताईये !' मराठीमधे, 'मग काय ? तो स्वत: पकडला जाऊ देता–पुलिसांचा चोप खाता नी पुलिसांच्या केसचा कबुलीजबाब लिहून देता ? आम्हांला दुसरे काही सांगा !' सरकारी वकिलांनी एवढेसे तोंड करून आपले भाषण आटोपते घेतले होते. सरकारी वकिलांचे भाषण संपल्यावर मी काही प्रत्युत्तर निवेदन करायला उठणार तोंच पीठावरून 'आप बैठ जाईए, आपको कुछ कहिने की जरूरत नहीं !' अशी आज्ञा झाली. मी अभिवादन करून खाली बसलो. चिरंजीव न्यायधीशमहोदयांनी रेव्हेन्यू न्यायाधीशमहोदयांना काही म्हटले व त्यांची मान डोलवलेली पाहिल्यावर शिरस्तेदाराला म्हटले, 'बुलाओंजी स्टेनो को !' (लघुलेखकाला बोलवा बरें !' व लघुलेखक येताच चिरंजीव न्यायाधीशमहोदयांनी आपले हात जुळवून त्याकडे पहात डोळे मिटले व लगेच आपला निर्णय सांगायला सुरुवात केली. त्यात कहाणीच्या कक्षेतले मुद्दे क्रमवार लिहवून विशेषत: कुऱ्हाड शासकीय संपत्ति असल्याने मनुआची असू शकत नाही, वनरक्षकाचीच असणे अधिक सयुक्तिक आहे. वनरक्षकाच्या डोक्याला लागलेला मुका मार पाय घसरून पडल्याने लागला की कुणी दांडके मारल्याने लागला हे कोर्टातल्या पुराव्यावरून नि:संदेहपणे सांगता येत नाही. कारण त्या घटनेचा समक्षदर्शी पुरावा नाही. तो मार मनुआ बंद्याने दिला असे सिद्ध होत नाही. सुरुवातीच्या रिपोर्टातच मनुआ फरार आहे हा निष्कर्ष ठाणेदारांनी कशाच्या आधारावर काढला होता याचे स्पष्टीकरण नाही. मनुआने बचावाचा पुरावा दिला नाही याचे महत्त्व नाही. पुलिसची केसच संशयास्पद आहे. साक्षीदार खरे सांगत नाहीत किंवा त्यांच्या पुराव्यावरून आरोप मनुआविरुद्ध सिद्ध होत नाही. अभियुक्त विरुद्ध आरोप सिद्ध झाला नाही. आधीनस्थ न्यायालयाने अभियुक्ताच्या दोषसिद्धीचा काढलेला निर्णय निस्सार व प्रभाहीन ठरविण्यात येत आहे. अपीलांट दोषमुक्त ठरविला जाऊन त्याला बंदीगृहातून तात्काळ मुक्त करण्यात यावे असा आदेश देण्यात येत आहे !' इत्यादि निर्णय लिहविला व एके ठिकाणी–कुऱ्हाडीच्या विषयात सेशन्सजज्जमहोदयांवरही ताशेरा झाडला की 'सेशन्स जज्जमहोदयांनी न्यायदानात मदत करण्याची हवी ती दक्षता दाखविली नाही !' शेवटी चिरंजीव न्यायाधीशमहोदयांनी मनुआ बंद्याकडे बघून म्हटले की, 'तुमको बरी (दोषमुक्त) किया जाता है !' हे म्हटलेले ऐकताच मनुआने, 'जय हो !' म्हणून जमिनीवर दंडवत घालून डोके टेकले व उठून हात जोडून म्हणाला, 'आपही मेरे भगवान हो ! भगवानने आपको हाथों मेरा इन्साफ किया है !' व माझे 'अपराध्याचे निरपराध मन' हे गीतापुराण संपले !

त्यानंतर मनुआ मधून मधून आमच्या गावी आला म्हणजे न चुकता मला भेटायला येई व येताना कधी अख्खा लाल भोपळा, तर कधी फुलगोबीचे मोठे फूल, तर कधी चार किलो नवीन पातळ सालीचे बटाटेच माझ्या घरी ठेवून जाई ! मी 'नको, नको !' म्हटले तर मला म्हणे, 'वकीलसाहाब, आप मेरे पिता हो ! बच्चे के खेतकी पैदा की हुई चीज भी आप नहीं पाओगे ?' मी त्याला पितृवात्सल्याने आशीर्वाद देत असे ! □

---

मराठी चित्रपट । सदानंद बोरसे

# लक्ष्मी

## अनंत माने यांचे भट्टीबाज चित्र

एका फॉर्म्युला चित्रपटात जे जे असते ते अधिक एका फॉर्म्युला मराठी चित्रपटात जे जे मिळू शकेल, त्या दोन्हींची बेरीज करून लक्ष्मीची भट्टी पेटविण्यात आली आहे. (अशी भट्टीबाज चित्रे देण्याबावत दिग्दर्शक अनंत माने त्यांचा लौकिक आहेच.) नेहमीप्रमाणे या चित्रपटात दोन पार्टर्या आहेत. एक देवपार्टी, दुसरी दानव पार्टी. देव पार्टीचा प्रमुख म्हणजे हिरो हा शीघ्रकवित्वापासून समाजसेवेपर्यंत सर्वगुणसंपन्न आणि सर्व क्रियापटाईत! (फक्त मारामारीचे अंगमेहनतीचे काम या चित्रपटात त्याला करायला लावले नाही, ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट.) दानवपार्टीचा हिरो म्हणजे खलनायक. हा आहे विकासवाडीच्या सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन. (आजपर्यंत मराठी चित्रपट पाटलांच्या फेट्यात अडकला होता, आता चेअरमनांच्या पांढऱ्या टोपीने त्याला अंगाखाली घेतलेले दिसते,) हा खलनायक बिचारा अत्यंत हुशारीने नायकाला अडकविण्यासाठी कारस्थानाचे जाळे विणतो; पण अगदी शेवटच्या घटकेला (म्हणजे अक्षरश: शेवटच्या पंधरा मिनिटांत) दानवपार्टीची काही मंडळी फुटल्याने, नायिकेच्या तथाकथित अक्कलहुषारीने ते जाळे खलनायकावर उलटवून नायक सहीसलामत राहतो आणि देवपार्टीचा ठरल्याप्रमाणे विजय होतो.

तर अशी ही सगळी भट्टी शक्य तितकी भडक पेटविली आहे आणि ते करण्यासाठी अक्षरश: शोधून–शोधून आणि ठरवून–ठरवून नेहमीनेहमीची उत्तम कोरडी, जळाऊ लाकडे वापरली आहेत–अगदी सुरुवातीपासूनच.

सुरुवातीलाच चेअरमन आपल्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडणाऱ्या विरोधी मंडळींपैकी तिघांना फोडण्यासाठी, खूष करण्यासाठी मुंबईला घेऊन जातात. कशाला ? तर कॅब्रे बघायला ! एका लाकडाची सोय झाली. हिंदीतील नटया परवडण्यासारख्या नसल्याने आणि मराठी नटी तयार होण्यासारखी नसल्याने असेल बहुधा; पण 'नवरा माझा ब्रह्मचारी'पासून मुंबईच्याच हॉटेलातील कॅब्रे–नर्तिकांना मराठी सिनेमावाले पडद्यावर नाचवू लागले आहेत.

मग जत्रेच्या निमित्ताने आणि नंतर चेअरमनसाहेबांच्या रंगेलपणाच्या निमित्ताने एक सवालजबाब आणि दोन तमाशाई नाच ! 'ग्रामीण प्रेक्षकांची सोय' या सोयिस्कर सबबीखाली लाकडांचा ढीग !

नायिका नायकाला न्याहरी घेऊन शेतावर जाते. दोघेही शहरवासी होऊन खेड्यात परतलेले असल्यामुळे त्यांनीही शहरात सिनेमे पाहिलेले असणार आणि मनुष्य हा अनुकरणप्रिय प्राणी असल्यामुळे तेही तसेच प्रेम करणार! मग गाण्यापासून शेवटी केळीच्या दोन पानांआड चेहरा लपविण्यापर्यंत (म्हणजे चुंबन, हे सुज्ञ प्रेक्षक ओळखतातच) सर्व प्रकारांच्या लाकडांचा आणखी मोठा ढीग !

या साऱ्याच्या जोडीला निवडणूक, त्यातील प्रचार, एक खून, नवऱ्याचे वकीलपत्र घेऊन त्याला सोडविणारी ('पाटला·ची'च्या ऐवजी 'देशमुखाची' बाणेदार) बायको, जत्रेतील बैलगाड्यांची शर्यत, बकऱ्यांची टक्कर, कुस्ती इत्यादी बारीक बारीक काटक्या तर भरपूर आहेत.

तर अशा सगळ्या बाजूंनी ही भट्टी नीट

पेटविण्यात आली आहे.

आता आपणही अशा भट्टाचांकडे 'मेलेल्या कोंबडयाला जाळाची भीती वाटत नाही' अशाच रीतीने पाहत असल्याने या सगळ्या-बद्दलही काही विधिनिषेध वाटत नाही; पण सिनेमात असे एकेक फर्मास अन् फाकडू विनोदी प्रसंग आहेत की बस !

नायक-नायिकेत नऊ वारी साडी, बायको करीत असलेली नवऱ्याची सेवा (ही सेवा की गुलामगिरी, यावर त्या प्रसंगी झालेली चर्चा) या विषयांवर झालेली तात्त्विक चर्चा हे आत्यंतिक कृत्रिमपणा आणि तकलादूपणा यामुळे आत्यंतिक विनोदी बनले आहेत. बायकोवरील प्रेम व्यक्त करण्यासाठी नायकाने साखरेच्या गोडपणाचा घेतलेला अतिरेकी आश्रय तर आपल्या जिभेला मुंग्या आणतो. 'चहात साखर नको' पासून सुरू झालेली साखर उप्पीट आणि शिरा यांच्या-तही भेद मानेनाशी झाली तेव्हा मला नाय-काला मधुमेह असल्याची जबर शंका यायला लागली होती; पण सर्वात कळस गाठला तो शेवटच्या न्यायालयाच्या प्रसंगाने. आरोपीला कडकात कडक शिक्षा द्यायला निघालेला न्यायाधीश आरोपीचे वकीलपत्र घेतले गेल्या-पासून 'त्याला आता निर्दोषच सोडायचे' असा पक्का निर्णय ठरविल्यागतच वागायला लागतो. कदाचित आरोपीला स्त्री-वकील मिळाल्याने हा फायदा त्याला मिळाला असावा. साक्षीदारही घडाघडा बोलतो, भरा-भर जादूची कांडी फिरल्याप्रमाणे पुरावे उलटतात की नायकाची निर्दोष मुक्तता ! वेळेच्या दृष्टीने एखादा प्रसंग मर्यादित करणे म्हणजे खोटेपणा वा तकलादूपणाच्या आसा-रीला तो गुंडाळणे नव्हे.

असो. अभिनयाच्या बाबतीत निळू फुले व रंजना सोडून बाकी सगळे 'ठीक'च्या सद-रात मोडणारे.

रंजनाच्या हालचालीतील आणि बोलण्या-तील थोडासा कृत्रिमपणा सोडल्यास तिचे काम चांगले झाले. कदाचित हालचालींतील अतिसफाई किंवा over-stylishness मुळे आणि बोलण्यातही अतिस्पष्ट (क्वचित छापीलही) शब्दोच्चारांमुळे हा कृत्रिमपणा जाणवत असावा.

संपूर्ण चित्रपट रंजनाचा थोडा वाटा सोडल्यास पेलला आहे तो निळू फुले यांनी. तशी या भूमिकेला समांतर कामे त्यांनी यापूर्वीही केलेली आहेतच. या चित्रपटातही जास्तीत जास्त वेळ कॅमेरा त्यांच्यावरच राहिला आहे. आपली संपूर्ण भूमिका जरी त्यांनी नेहमीच्या आबात, कधी चेहऱ्यावर गुळमट, धूर्त हसू खेळवत, तर कधी नजरेतील जरबेने माणसाला खिळवत, कधी आत्यंतिक हुषारीने डाव खेळत तर कधी अडकलेल्या जनावरांप्रमाणे अविचारी उडी घेत वागणारा चेअरमन सुरेख उभा केला आहे. त्यांचे जड आणि जाड आवाजातील बोलणे, तिरक्या उतरत्या भुवया अशा सगळ्याच गोष्टी त्यांना साथ देतात. विशेषत: मध्यंतरापूर्वीचा संग्रामराव देशमुखाच्या घराण्याच्या मोठे-पणावर आगपाखड करतानाचा, अपमानाने संतापून लग्न मोडतानाचा प्रसंग त्यांनी सुरेख साकार केला आहे. त्या वेळी त्यांच्या खदखदणाऱ्या जिवंत चेहऱ्यावर पडणारा, पुन्हा दूर होणारा लोंबत्या दिव्याच्या प्रका-शाचा परिणामही सुरेख साधला आहे. जर हा माणूस (किंवा तितक्याच योग्यतेचा दुसरा एखादा अभिनेता) चित्रपटात नसता तर चित्रपटाचे काय झाले असते, याची कल्पनाच करवत नाही.

अभिनयाच्या बाबतीतील आणखी काही उल्लेख—

घनाजीच्या भूमिकेत राम नगरकरांच्या 'हे हे हे हे हे ऽऽ' असल्या हसण्याने प्रथम वैताग, नतर सौम्य डोकेदुखी. नंतर अर्धशीशी आणि शेवटी मस्तकशूळ उठविला !

'अलबेला'च्या पुण्याईमुळे भगवानच्या नाचण्याला लोक शिट्ट्या मारीत असले, तरी आता त्याला अधिक नाचायला लावून त्याचा अंत पाहू नये.

चित्रपटाद्वारे शोभा जोशी यांना पार्श्व-गायिका म्हणून मिळालेली संधी आणि प्रीती सागर आणि सुरेश वाडकर यांचा मराठीत प्रवेश ही संगीतकार राम कदम यांची कामगिरी. बाकी गाणी वा पार्श्वसंगीतात नाविन्य काही नाही.

गीतकार आहेत जगदीश खेबुडकर. एका गीताच्या ओळी— 'रंग आला आला पैंजणा; आम्ही इंद्राच्या दरबारी कामिना' यातील 'कामिना' असे 'कामिनी'चे सोयिस्कर रूपांतर केल्याबद्दल खेबुडकरांना (आनंद) बक्षीगिरी का देऊ नये ?

आजच्या average हिंदी चित्राइतकेच सरस तंत्र (विशेषत: छायाचित्रणाच्या बाबतीत) हीही एक वैशिष्टयपूर्ण गोष्ट.

जाता जाता—

चित्रपटांच्या नामावलीत तरी सर्व शब्द एखाद्या शुद्धलेखनाचे नियम माहीत असलेल्या माणसाकडून तपासून घ्यावेत म्हणजे 'जाग-तीक, काल्पनीक' हेच शुद्ध शब्द असल्याचा गैरसमज दूर होतो. □

---

## राजधानी दिल्ली : पृष्ठ २ वरून

राजीनामा देऊन नवे मंत्रिमंडळ बनवितील. तसे झाले तर मालवीय यांच्या बडतर्फीचा वाद आपोआपच संपुष्टात येऊ शकेल.

### पटनाईक यांचा इशारा

चरणसिंग आणि जगजीवनराम यांच्यातील स्पर्धा राज्यपातळीवर झिरपत जात असल्यामुळे हरयाना आणि उत्तरप्रदेश येथील मंत्रि-मंडळांमध्ये विसंवाद वाढत चालला आहे हे गेल्या पंधरा दिवसांतील घटनांनी दाखवून दिले आहे आणि म्हणूनच बिजू पटनाईक यांनी मोरारजी देसाई, चरणसिंग आणि जगजीवनराम या त्रिमूर्तीला आपापसातील मतभेद मिटविण्याचे आवाहन केले आहे. इतकेच नव्हे तर तसे करणे जमत नसेल तर सत्तात्याग करण्याचीही सूचना केली आहे. या त्रिमूर्तीमधील कलह संपुष्टात आला नाही तर जनता पक्ष विरफळला जाईल असा स्पष्ट इशाराही पटनाईक यांनी दिला आहे. बिजू पटनाईक यांनी व्यक्त केलेली भीती इतर केंद्रीय मंत्र्यांनाही सतावीत आहे. म्हणून पटनाईक यांच्यासमवेत वाजपेयी, अडवानी, फर्नांडिस, एच्. एम्. पटेल आणि मोहन धारिया या मंत्र्यांनी नुकतीच जगजीवनराम यांची भेट घेऊन पक्षापुढे उभ्या ठाकलेल्या समस्ये-संबंधी तासभर चर्चा केली. पटनाईक प्रभृतींनी सुरू केलेल्या या प्रयत्नांना रवींद्र वर्मा आणि मधु दंडवते या आणखी दोन मंत्र्यांचा पाठिंबा आहे. ज्येष्ठांची समजूत काढण्याचा या दुसऱ्या फळीतील मंत्र्यांवर प्रसंग यावा यावरून हे दुखणे वरिष्ठ पातळीवर कसे ठस-ठसत आहे याची कल्पना येऊ शकते. 'आम्हा तिघात कोणतेही मतभेद नाहीत,' एवढी केवळ जाहीर घोषणा मोरारजी देसाई, चरणसिंग आणि जगजीवनराम यांनी केली तरी काम भागणार नाही; हे तिघे नेते एकविचाराने, एकदिलाने काम करीत आहेत असे प्रत्यक्ष दृश्य दिसले पाहिजे अशी दुसऱ्या फळीतील मंत्र्यांची अपेक्षा आहे. या तिघा वरिष्ठ नेत्यांनी निवृत्त व्हावे असे कोणालाही वाटत नाही. कारण तसे झाले तर पेचप्रसंग सध्या आहे त्यापेक्षाही तीव्र होईल हे सगळेजण जाणून आहेत. म्हणून गेल्या वर्षभरातील कुरबुरींवर पडदा टाकून त्या तिघांनी मन:पूर्वक एकत्र यावे यावर जोर दिला जात आहे. आझमगडच्या पार्श्वभूमीवर या आवाहनाला विशेषच अर्थ प्राप्त झालेला आहे. □

**अनेकांचे धन येथे, एके ठायी आले**

**अनेकांच्या सेवेसाठी, येथे आतुर थांबले**

आपल्यापैकीच काहींनी बचत केली, करत आहेत आणि करतीलही. तोच पैसा संचित झाला आहे आणि योग्य तो विनियोग व्हावा यासाठी, खरं तर हा पैसा देखील आतुर आहे. 'विलोपले मधु मीलनात या' म्हणणाऱ्या नवयुवतीप्रमाणे —

स्वतःच्या आणि समाजाच्या प्रगतीसाठी आपण त्याचा उपयोग करून घ्यावा हीच अपेक्षा आहे. तुम्ही कॉलेजच्या बाहेर पडलेले उमेदीचे पदवीधर असा, किंवा विणकामाचा व्यवसाय सुरू करण्यास उत्सुक असा, वाकबगार चर्मकार असा.... तुमच्या उमेदीला पैशांची साथ द्यावयाला आम्ही आतुर आहोत.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

**( भारत सरकारचा उपक्रम )**

**मुख्य कचेरी : ११७७, बुधवार पेठ,**
**पुणे ४११ ००२**